वृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | सोमवार | दि. २४ ऑगस्ट २०२६ | अंक ७९ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

चंदेरी किल्ल्यावरुन तिघांची सुटका

पनवेल : चंदेरी किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेलेल्या तीन तरुणांचा डोंगरात रस्ता चुकल्याने ते भरकटले. ओम खिलारी, पार्थ कडवे आणि रूषिल वृंदावन हे तिघेही कामोठे, पनवेल येथील रहिवासी असून ते चंदेरी किल्ला, तामसई येथे ट्रेकिंगसाठी आले होते. मदतीसाठी त्यांनी ११२ क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून तिन्ही तरुणांना सुखरूपपणे गडाच्या पायथ्याशी आणले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) आनंद कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश मोकाशी, पोलीस हवालदार अमर भालसिंग आणि पोलीस नाईक मिलिंद जाधव यांनी शोधमोहीम राबवली.

सात वर्षांच्या मुलीचा लैंगिक छळ

नेरळ : कर्जत तालुक्यातील चाफेवाडी येथील एका खासगी फार्महाऊसमध्ये सात वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी नेरळ पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक केली असून, पोक्सो कायद्यासह भारतीय न्याय संहितेंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलीचे आई-वडील संबंधित फार्महाऊसमध्ये केअरटेकर म्हणून काम करतात. २० ऑगस्ट रोजी आई आणि वडील कामानिमित्त बाहेर असताना आरोपीने मुलीला खोलीत बोलावून तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. घडलेला प्रकार मुलीने आईला सांगितल्यानंतर कुटुंबियांनी नेरळ पोलिसांत तक्रार दाखल केली.

वेधक

आजपासून सिमकार्डच्या नियमांत बदल

नवी दिल्ली : दूरसंचार विभागाकडून सिमकार्डच्या मर्यादेबाबतचे नियम अधिक कडक करण्यात येणार आहेत. २४ ऑगस्टपासून एखाद्या व्यक्तीच्या नावावर निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक सक्रिय सिमकार्ड असल्यास नवीन सिम कनेक्शन देण्यास नकार दिला जाऊ शकतो. नियमांनुसार, बहुतांश राज्यांमध्ये एका व्यक्तीला जास्तीत जास्त ९ सिमकार्ड ठेवता येतात. जम्मू-काश्मीर, आसाम आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये ही मर्यादा ६ सिमकार्डांची आहे. नवीन सिम घेण्यापूर्वी आपल्या नावावर किती मोबाइल क्रमांक सक्रिय आहेत, हे 'संचार साथी' पोर्टलवर तपासता येणार आहे. वापरात नसलेला क्रमांक तक्रार करून बंद करता येणार आहे.

आता नर्सिंगचाही पेपर फुटला

परभणी : नीट आणि टीईटीनंतर आता नर्सिंग परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेच्या गोपनीयतेचा भंग झाल्याचा धक्कादायक प्रकार परभणीत समोर आला आहे. परीक्षा पर्यवेक्षिकेने आपल्या बहिणीसाठी प्रश्नपत्रिकेचे मोबाईलवर छायाचित्र काढून ते व्हॉट्सॲपवर पाठवल्याचे उघडकीस आले. परभणीतील इंदिरा गांधी एएनएम नर्सिंग स्कूलमध्ये २० ऑगस्ट रोजी जीएनएम प्रथम वर्षाची परीक्षा सुरू असताना सकाळी साडेदहा वाजता पर्यवेक्षिका राखी चव्हाण यांनी प्रश्नपत्रिकेचा फोटो काढून तो बहिणीला पाठवला. केंद्र निरीक्षकांनी संशयावरून मोबाईल तपासला असता हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी नानल पेठ पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करुन, चार जणांना अटक केली आहे.

गणेशमूर्ती कोसळली; दोघांचा मृत्यू

मुंबई : गणेशोत्सवाच्या तयारीदरम्यान भुलेश्वर परिसरात शनिवारी रात्री मोठी दुर्घटना घडली. सुमारे २२ फूट उंच 'भुलेश्वरचा राजा' गणपतीची मूर्ती मंडपात नेत असताना अचानक कोसळली. मूर्ती अंगावर पडल्याने दोघांचा मृत्यू झाला, तर पाच जण जखमी झाले. जय आंबे चौकात रात्री १० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. जखमींमध्ये ५ आणि ७ वर्षांच्या दोन मुलींचाही समावेश असून, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

चिंचोटीतील 'जलजीवन' चौकशीच्या फेऱ्यात!

चौकशी रखडल्याचा तक्रारदारांचा आरोप | गटविकास अधिकाऱ्यांनाही सहआरोपी करण्याची मागणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

चिंचोटी ग्रामपंचायतीतील जलजीवन मिशन योजनेतील कथित गैरव्यवहार आता चांगलाच तापण्याची चिन्हे आहेत. शासकीय निधीच्या कथित गैरवापराबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार करून दोन महिने उलटले, तर रेवदंडा पोलिसांनी चौकशीसाठी प्रकरण अलिबाग पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे वर्ग करूनही महिनाभर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असा गंभीर आरोप तक्रारदार ॲड. राकेश नारायण पाटील यांनी केला आहे. याच पार्श्वभूमीवर गटविकास अधिकाऱ्यांना थेट 'सदर प्रकरणात सहआरोपी का करू नये?' अशी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

चिंचोटी ग्रामपंचायतीमार्फत जलजीवन मिशन योजनेसाठी मंजूर झालेल्या निधीत सरपंच, ग्रामसेवक आणि संबंधित ठेकेदार यांनी संगनमताने कथित आर्थिक व प्रशासकीय गैरव्यवहार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. खोटी कागदपत्रे, शासकीय निधीचा कथित गैरवापर आणि यंत्रणांची दिशाभूल केल्याचा आरोप करत ॲड. पाटील यांनी १९ जून २०२६ रोजी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर रेवदंडा पोलिसांनी १६ जुलै रोजी सदर प्रकरण चौकशी करून आवश्यक कारवाई व अभिप्राय सादर करण्यासाठी अलिबाग पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे वर्ग केले. मात्र, त्यानंतरही चौकशीला गती मिळाली नसल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

ग्रामपंचायतीकडील प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, निधी वितरण, •➤पान २ वर

चौकशीच नसेल तर संशय कुणावर?

शासकीय निधीच्या कथित गैरव्यवहाराची तक्रार पोलिसांकडून सक्षम प्रशासकीय अधिकाऱ्याकडे वर्ग झाल्यानंतरही चौकशी रखडत असेल, तर त्यामागचे कारण काय, असा सवाल तक्रारदारांनी उपस्थित केला आहे. संबंधित कागदपत्रे सुरक्षित ठेवणे, प्रत्यक्ष कामाची पडताळणी करणे, ही अधिकाऱ्यांची जबाबदारी असताना त्याकडे दुर्लक्ष का झाले, असा प्रश्न तक्रारदारांनी उपस्थित केला आहे. चौकशी न झाल्याने संबंधितांना अभय मिळत आहे का? कागदपत्रांमध्ये फेरफार करण्याची संधी दिली जात आहे का? कथित गैरव्यवहार झाकण्याचा प्रयत्न होत आहे का? या प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाला द्यावी लागणार आहेत, असे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

गटविकास अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करा

जलजीवन मिशनमधील कथित गैरव्यवहाराची तक्रार आपल्या कार्यालयाकडे वर्ग झाल्यानंतरही आपण प्रभावी चौकशी केली नाही. संबंधित कागदपत्रे मागविली नाहीत, प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली नाही किंवा निधीच्या वापराची पडताळणी केली नाही, तर संबंधितांना संरक्षण देण्यासाठी आपण कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर केली असल्यास आपल्या भूमिकेची स्वतंत्र चौकशी करून या प्रकरणात आपणास सहआरोपी का करू नये, याबाबत सात दिवसांत स्पष्ट लेखी खुलासा द्यावा, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

> चिंचोटीमध्ये जलजीवनच्या घोटाळ्याची जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार करून दोन महिने उलटूनही त्यांनी सदरचे प्रकरण ढापण्याचा प्रकार केला आहे. रेवदंडा पोलिसांनी अलिबाग गटविकास अधिकाऱ्यांकडे या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्यासाठी वर्ग केलेली आहे. मात्र, गटविकास अधिकाऱ्यांनीसुद्धा एक महिन्याचा कालावधी उलटूनही कारवाई न केल्यामुळे घोटाळेबाजांना जाणीवपूर्वक संरक्षण देत असून, आपल्या कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर करीत असल्याचे दिसून येत असल्यामुळे त्यांना या प्रकरणात सहआरोपी का करू नये? याबाबतची लेखी नोटीस दिली आहे.
>
> **– ॲड. राकेश पाटील,** तक्रारदार

> जलजीवन मिशन योजना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविली जाते. याबाबत आताच काही सांगता येणार नाही. संबंधित प्रकरणात अधिक माहिती घेतल्यानंतर बोलणे उचित ठरेल.
>
> **– शर्मिला पाटील-पिंगळे**
> गटविकास अधिकारी

शिव्या देतात म्हणून सुधारणार नाही!

- राहुल गांधींचा मोदी सरकारवर थेट घणाघात
- 'छात्रो की गुंज'मध्ये महिलांच्या स्वातंत्र्याचा मुद्दा ऐरणीवर
- पुरुषप्रधान आणि मनुवादी मानसिकतेवर प्रहार

। पुणे । प्रतिनिधी ।

''गेल्या अनेक वर्षांपासून मला शिव्या दिल्या जात आहेत; पण मी सुधरणार नाही!'' या राहुल गांधींच्या थेट आणि आक्रमक वक्तव्याने पुण्यातील 'छात्रो की गुंज' कार्यक्रमात राजकीय वातावरण चांगलेच तापले. हजारो विद्यार्थिनींच्या उपस्थितीत रविवारी राहुल गांधी यांनी महिलांवरील अत्याचार, लैंगिक शोषण, असमान वेतन आणि महिलांच्या स्वातंत्र्यावरून केंद्रातील मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. मुलींनी व्यक्त केलेला आक्रोश 'सांस्कृतिक धक्का' वाटतो; पण मुलांनी केलेल्या त्याच प्रकारच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले जाते, असा सवाल करत राहुल गांधी यांनी सरकारच्या कथित पुरुषप्रधान आणि मनुवादी मानसिकतेवर थेट निशाणा साधला.

राहुल गांधी यांनी महिलांना दुय्यमवागणूकदेणाऱ्यामानसिकतेवर कडाडून टीका केली. मुलींनी शिवीगाळ केली की संस्कृतीचा प्रश्न उपस्थित केला जातो; मात्र मुलांनी तशी भाषा वापरली तर त्याकडे दुर्लक्ष केले जाते, हा दुहेरी मापदंड असल्याचे त्यांनी म्हटले. मुलींवर नियंत्रण हवे, त्यांना एका चौकटीत बंदिस्त ठेवायचे आणि मुलांना मात्र पूर्ण स्वातंत्र्य द्यायचे अशी मानसिकता आम्हाला मान्य नाही, असा थेट हल्ला त्यांनी केला.

कार्यक्रमात राहुल गांधी यांनी महिलांवरील अत्याचार आणि लैंगिक शोषणाच्या •➤पान २ वर

महामार्गावर नडगाव हद्दीत दरड कोसळली

। महाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावर नडगाव गावाच्या हद्दीत दरड रस्त्यावर आल्याने गोव्याच्या दिशेने जाणारी वाहतूक काही काळ बंद झाली. दरडीचे मोठे तुकडे रस्त्यावर पडल्याने वाहनचालकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दरड रस्त्यावर आल्याची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, महामार्ग विभागाचे कर्मचारी तसेच एल अँड टी कंपनीचे कामगार तातडीने घटनास्थळी दाखल झाले. रस्त्यावर आलेली दरड हटविण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले.

अवघ्या अर्ध्या तासात दरडीचे तुकडे बाजूला करून मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. सुरुवातीला खबरदारी म्हणून पोलिसांनी मोहोप्रे गावापासून दोन्ही बाजूने जाणारी वाहने एकाच मार्गाने सोडून एकेरी वाहतूक सुरू ठेवण्यात आली होती. प्रशासन व संबंधित यंत्रणांनी तत्परतेने केलेल्या •➤पान २ वर

वृद्धाला कौटुंबिक वादातून मारहाण

। पेण । प्रतिनिधी ।

करंबेळीवाडी येथे कौटुंबिक वादातून झालेल्या मारहाणीत वृद्धाच्या डोक्यात दगडाने प्रहार करून दुखापत केल्याची घटना २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास घडली. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शेतावरून घरी परतले असता त्यांचा मुलगा, सून आणि नातवाला आरोपींनी हाताबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ केली. यावेळी नातवाला खाली पाडून त्याच्या पाठीवर व पायावर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली जात होती. फिर्यादी भांडण सोडविण्यासाठी गेले असता आरोपी क्रमांक दोन व चार यांनी त्यांनाही मारहाण करून शिवीगाळ केली. त्यानंतर फिर्यादीचे लक्ष नसताना आरोपी क्रमांक एकाने हातातील दगडाने •➤पान २ वर

एकाच रस्त्याला दोनदा निधी?

- बोर्ली ग्रामपंचायतीच्या कारभारावर संशय
- मोजमाप पुस्तिकाच गायब, चौकशीची मागणी

। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।

बोर्ली ग्रामपंचायतीच्या कारभारावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. चंद्रकांत चोगले यांच्या घरापासून सुर्वे घरापर्यंतच्या एकाच रस्त्याच्या कामासाठी दोन वेगवेगळ्या आर्थिक वर्षांत दोन कंत्राटदारांच्या माध्यमातून निधी खर्च झाल्याची नोंद समोर आल्याने शासकीय निधीच्या वापराबाबत संशय बळावला आहे. त्यातच माहिती अधिकारातून कागदपत्रे मागितल्यानंतर या कामाची मोजमाप पुस्तिका (एमबी) उपलब्ध नसल्याचे समोर आल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रतिक कणगी आणि राजेश तरे यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती मुरुड यांच्याकडे तक्रार दाखल करून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, संबंधित रस्त्याचे काम दोन वेगवेगळ्या आर्थिक वर्षांत दोन वेगवेगळ्या कंत्राटदारांकडून झाल्याची नोंद कागदपत्रांमध्ये दिसून येते. त्यामुळे एकाच रस्त्याचे काम दोनदा दाखवून शासकीय निधी खर्च करण्यात आला का? असा थेट सवाल उपस्थित झाला आहे.

सार्वजनिक बांधकामाच्या प्रत्यक्ष कामाची मोजणी, कामाचे प्रमाण आणि त्यानुसार देयक निश्चित करण्यासाठी मोजमाप पुस्तिका हा महत्त्वाचा अधिकृत दस्तऐवज असतो. •➤पान २ वर

ऐन सणासुदीत महागाईचा नारळ!

। चौल । प्रतिनिधी ।

इंधन दरवाढीने सर्वसामान्य जनता आधीच होरपळली असताना ऐन सणासुदीच्या दिवसांत दररोजच्या जेवणात लागणारा नारळ दहा रुपयांनी महागला आहे. ३० रुपयांपासून ५० रुपयांपर्यंत मिळणाऱ्या नारळाच्या किमती थेट पाच ते दहा रुपयांनी महागल्या आहेत. त्यामुळे आता रोजच्या भाजी, आमटीत खोबरे कमी वापरावे लागणार असल्याची खंत गृहिणींकडून व्यक्त केली जात आहे. नारळी पौर्णिमा, सणासुदीत खोबऱ्याचा वापर करून केले जाणारे गोडधोड यालाही नारळाच्या महागाईचा फटका बसणार आहे.

आखाती युद्धाचे कारण देत सरकारने केलेल्या इंधन दरवाढीमुळे दैनंदिन वापरातील अनेक वस्तूंच्या किमती वाढल्याने सर्वसामान्य

आधीच मेटाकुटीला आले आहेत. यातच आता रोजच्या वापरातील स्वयंपाकाच्या वस्तूंच्या किमती वाढल्याने सणासुदीच्या दिवसात उसनवारीची वेळ येणार आहे. रायगडातील किनारी भागात अलिबाग, चौल, नागाव, रेवदंडा, मुरुड, श्रीवर्धनमध्येही नारळाच्या मोठ मोठ्या वाड्या आहेत. परंतु, वाढत्या किडीच्या प्रादुर्भावामुळे नारळाचे पीक धोक्यात आले आहे. पावसाळ्यात तर नारळ पिकावर अधिकचा परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे ऐन सुनासुदीच्या काळात मागणी असली, तरी आवक कमी असल्याने दरात वाढ झाली आहे.

राज्यात पावसाळ्यात उष्णता वाढल्यानं नारळ खराब होत त्यांना कीड लागली. त्यामुळं नारळाच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. दरम्यान, गणेशोत्सवामुळं नारळाची मागणी जास्त आणि आवक कमी असल्यानं नारळाचे भाव पाच ते दहा रुपयांनी वाढले आहेत. तसंच सुके खोबऱ्याची किंमत ४०० रुपये किलोपर्यंत गेल्यानं गणेशोत्सवाच्या तोंडावर ग्राहकांना महागाईचा फटका बसणार आहे.

सणासुदीत प्रसाद, देवपूजा, मिठाई, मोदक या पदार्थांसाठी नारळ खोबऱ्याची मोठी मागणी असते. मात्र, यंदा राज्यामध्ये पावसाळ्यात उष्णता वाढल्यानं नारळांना कीड लागली. जिथं एका झाडावर १०० नारळ येत होते, •➤पान २ वर

प्रसादाच्या किमती वाढणार

गणेशोत्सव सुरू होण्यास अवघे काही दिवस बाकी आहेत. या दिवसात गौरी-गणपतीला खिरापतीचा प्रसाद दिला जातो. परंतु, महत्त्वाच्या सणात नारळ महाग झाल्यानं खोबऱ्याचा कीस ६०० ते ६५० रुपये किलो मिळण्याचा अंदाज नारळ व्यावसायिकांनी व्यक्त केला आहे. यासोबतच मिठाईतदेखील नारळाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. मात्र, नारळ महागल्यानं नारळाचे मोदक, लाडू आणि मिठाईच्या दरातदेखील वाढ होणार आहे.

बाप्पांचे मोदक, खिरापत महागणार

ग्राहकांच्या खिशाला बसणार कात्री

मानाच्या हंडीला प्रशांत नाईक यांची नवी दिशा | २४ वर्षांची गौरवशाली परंपरा

'जेन-झी'च्या उत्साहात दहीहंडीचा नवा थरार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मानाची दहीहंडी ही केवळ गोविंदांची स्पर्धा नसून, अलिबागच्या सांस्कृतिक अस्मितेची ओळख जपणारा लोकउत्सव आहे. २४ वर्षांची ही गौरवशाली परंपरा आता जेन-झी पिढीशी जोडत परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम घडवण्याचा संकल्प शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी युवक आघाडी व प्रशांत नाईक मित्र मंडळाने केला आहे. यंदाची मानाची दहीहंडी अधिक भव्य, आकर्षक आणि युवककेंद्रित करण्यासाठी नियोजनाला सुरुवात झाली असून, अलिबागच्या सर्वात प्रतिष्ठेच्या दहीहंडीला नव्या उंचीवर नेण्यात येणार असल्याचे प्रशांत नाईक यांनी स्पष्ट केले.

रविवारी शेतकरी भवन, अलिबाग येथे झालेल्या नियोजन सभेत मंडळाचे अध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वाखाली स्पर्धेच्या आयोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी प्रदीप नाईक, नगरसेविका संध्या पालवणकर तसेच नगरसेवक अनिल चोपडा, सागर भगत, ऋषिकेश माळी, आनंद पाटील यांच्यासह मित्र मंडळाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२४ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या या स्पर्धेत यंदा पारंपरिक गोविंदा थरांसोबतच युवकांच्या सर्जनशीलतेला चालना देणाऱ्या रील स्टार स्पर्धेचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे पारंपरिक उत्सवाला आधुनिक अभिव्यक्तीची जोड मिळणार आहे.

पुरुष गोविंदा पथकासाठी २,५१,००० व मानाचा चषक, तर महिला गोविंदा पथकासाठी १,०१,००० व मानाचा चषक अशी प्रथम पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. तसेच रील स्टार स्पर्धेत प्रथम ११,०००, द्वितीय ७,००० आणि तृतीय ५,००० रुपये रोख अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. अलिबागच्या सांस्कृतिक अस्मितेशी जोडलेली मानाची दहीहंडी यंदाही परंपरा, प्रतिष्ठा आणि विजयाचा जल्लोष अधिक दिमाखात साजरा करणार असल्याचा विश्वास प्रशांत नाईक यांनी व्यक्त केला.

२५ ऑगस्टपासून नोंदणी

स्पर्धेचे अर्ज २५ ऑगस्ट २०२६ पासून शेतकरी भवन, अलिबाग येथे उपलब्ध होणार असून, राज्यभरातील गोविंदा पथके आणि युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले.

ऑगस्टअखेर पावसाची एन्ट्री

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाने उसंत घेतला आहे. राज्यात सर्वदूर अपेक्षित पाऊस पडताना दिसत नाही. त्यामुळे शेतकरीदेखील चिंतेत आहेत. पण, राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी दिली. राज्यात ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात काही जिल्ह्यात पाऊस पडणार आहे. योगायोगाने हे स्वाती नक्षत्र आहे. एक म्हण आहे, पडतील स्वातीत तर पिकतील मोती. तशीच परिस्थिती होणार आहे. शेवटच्या आठवड्यात २५ ते २८ ऑगस्ट या काळात पाऊस पडणार आहे, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.

ग्रामसेवकांच्या हजेरीवर आता 'डिजिटल' लक्ष!

ग्रामविकास विभागाचे राज्यातील सर्व मुख्य कार्यकाऱ्यांना आदेश

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्यातील ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या उपस्थितीवर आता डिजिटल पद्धतीने लक्ष ठेवण्यात येणार आहे. यासाठी संबंधितांची जीपीएस आणि बायोमेट्रिक प्रणालीद्वारे हजेरी घेण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाने घेतला असून, याबाबत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लेखी सूचना देण्यात आल्या आहेत.

ग्रामपंचायतीच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजात ग्रामसेवकांची भूमिका महत्त्वाची असते. विविध शासकीय योजना, दाखले, प्रमाणपत्रे, करवसुली तसेच ग्रामपंचायतीशी संबंधित विविध कामांसाठी ग्रामस्थांना ग्रामसेवकांशी संपर्क साधावा लागतो. मात्र, शासनाने ठरवून दिलेल्या वेळेत ग्रामसेवक कार्यालयात उपलब्ध नसल्याने अनेकदा नागरिकांना दाखले आणि प्रमाणपत्रांसाठी वारंवार ग्रामपंचायत कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागतात. पूर्वसूचना न देता गैरहजर राहण्याच्या तक्रारींमुळे ग्रामस्थांची कामे प्रलंबित राहण्याचे प्रकारही समोर आलेले आहे. यामुळे ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकाऱ्यांना आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत कार्यालय, तसेच नेमणूक असणाऱ्या गावात नियमित •➤पान २ वर

भक्तांचे श्रद्धास्थान चौलचे कुंडेश्वर

प्रशांत वर्तक

अलिबाग तालुक्यातील चौलनगरीला इतिहास, संस्कृती आणि अध्यात्माची समृद्ध परंपरा लाभली आहे. या प्राचीन भूमीत अनेक श्रद्धास्थळे आजही ग्रामस्थांच्या आस्थेचे केंद्र बनून उभी आहेत. चौलमधील राऊत पाखाडीतील कुंडेश्वर मंदिर हे त्यापैकीच एक. शांत परिसर, प्राचीन परंपरा आणि शिवभक्तांच्या अढळ श्रद्धेमुळे या मंदिराला पंचक्रोशीत विशेष स्थान प्राप्त झाले आहे.

श्रावण महिना सुरू झाला की कुंडेश्वराच्या मंदिरात भक्तीचा माहोल निर्माण होतो. श्रावणातील प्रत्येक सोमवारी पंचक्रोशीतील भाविक हमखास कुंडेश्वराच्या दर्शनासाठी येतात. सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची वर्दळ सुरू होते. 'हर हर महादेव'च्या जयघोषात शिवलिंगावर जलाभिषेक, बेलपत्र अर्पण आणि पूजा-अर्चा केली जाते. श्रद्धेने नतमस्तक होणाऱ्या भक्तांसाठी हे मंदिर केवळ देवदर्शनाचे ठिकाण नसून, मनः शांती देणारे आध्यात्मिक स्थान आहे.

कुंडेश्वराच्या शिवलिंगाबाबत स्थानिकांमध्ये एक रंजक आख्यायिका प्रचलित आहे. हे शिवलिंग पूर्वी आपोआप वाढत होते, अशी ग्रामस्थांची श्रद्धा आहे. शिवलिंगाची वाढ अशीच सुरू राहिली तर काही अघटित घडेल, अशी भीती त्यावेळी ग्रामस्थांच्या मनात निर्माण झाली. त्यामुळे शिवलिंगाची वाढ थांबविण्यासाठी त्यावर खिळा मारण्यात आला, अशी आख्यायिका सांगितली जाते. विशेष म्हणजे, हा खिळा आजही शिवलिंगावर पाहायला मिळतो. श्रद्धा आणि लोकपरंपरेतून पुढे आलेली ही कथा कुंडेश्वराच्या वैशिष्ट्याला अधिक गूढ आणि वेगळे रूप देते. या आख्यायिकेची सत्यता इतिहासाच्या कसोटीवर तपासण्याचा विषय वेगळा असला, तरी पिढ्यान्पिढ्या सांगितली जाणारी ही कथा स्थानिकांच्या श्रद्धेचा अविभाज्य भाग बनली आहे. मंदिरातील शिवलिंगाकडे पाहताना भाविकांच्या मनात या आख्यायिकेची आठवण जागी होते आणि श्रद्धेची भावना अधिक दृढ होते.

काही वर्षांपूर्वी स्थानिक ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन या मंदिराचा जीर्णोद्धार केला. ग्रामस्थांच्या श्रम, सहकार्य आणि श्रद्धेतून मंदिराला नवे रूप मिळाले. मंदिराच्या विकासामागे कोणत्याही एका व्यक्तीपेक्षा संपूर्ण ग्रामसमुदायाची सामूहिक भावना दिसून येते. त्यामुळे हे मंदिर गावाच्या श्रद्धेबरोबरच ग्रामएकतेचेही प्रतीक ठरते. मंदिराच्या परिसरातील देखणी दीपमाळही भाविकांचे लक्ष वेधून घेते. दीपमाळ उजळली की मंदिर परिसराचे रूपच बदलून जाते. विशेषतः त्रिपुरारी पौर्णिमेच्या वेळी येथे दीपोत्सवाचे वातावरण निर्माण होते. दीपांच्या प्रकाशाने उजळलेला परिसर आणि मंदिरातील भक्तिमय वातावरण मनाला प्रसन्न करून जाते.

महाशिवरात्रीला कुंडेश्वर मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होते. रात्रभर सुरू असलेल्या पूजा, अभिषेक आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे परिसर शिवमय होऊन जातो. पंचक्रोशीतील भाविकांसाठी महाशिवरात्रीचा दिवस म्हणजे कुंडेश्वराच्या चरणी माथा टेकवण्याचा आणि भक्तीचा अनुभव घेण्याचा विशेष दिवस असतो. कुंडेश्वराचे महत्त्व केवळ धार्मिकतेपुरते मर्यादित नाही. अशा देवस्थानांच्या माध्यमातून गावाची परंपरा, लोककथा, श्रद्धा आणि सांस्कृतिक वारसा पुढच्या पिढीकडे पोहोचत असतो. आजच्या वेगवान आणि बदलत्या जीवनशैलीत मोबाईलच्या पडद्यामागे हरवत चाललेल्या माणसाला अशी देवस्थाने आपल्या मातीशी आणि परंपरेशी जोडून ठेवतात.

कुंडेश्वर मंदिराच्या परिसरात उभे राहिल्यावर जाणवते ती केवळ देवाची उपस्थिती नव्हे, तर अनेक पिढ्यांच्या श्रद्धेची साक्ष. ज्यांनी या देवस्थानाची सेवा केली, ज्यांनी त्याच्या जतनासाठी हातभार लावला आणि ज्यांनी आपल्या पुढच्या पिढीला ही परंपरा सांगितली, त्या सर्वांच्या भावनेचा हा वारसा आहे.

चौलच्या ऐतिहासिक भूमीत राऊत पाखाडीतील कुंडेश्वर आजही भक्तांच्या श्रद्धेचा दीप तेवत ठेवत आहे. श्रावणातील सोमवार असो, महाशिवरात्र असो किंवा त्रिपुरारी पौर्णिमेच्या दीपज्योतीने प्रत्येक वेळी या देवस्थानाचा परिसर भक्तीने उजळून निघतो. श्रद्धेचा वारसा जपल्यामुळेच कुंडेश्वर चौलच्या सांस्कृतिक स्मृतीचा आणि ग्रामएकतेचा जिवंत ठेवा असून, पुढच्या पिढ्यांनाही प्रेरणा देत आहे.

पान १ वरून

चिंचोटीतील 'जलजीवन' चौकशीच्या फेऱ्यात!

बँक व्यवहार, कामाचे आदेश, मोजमाप पुस्तिका, बिले, देयके, पूर्णत्व प्रमाणपत्र, कामाचे छायाचित्रे व भू-अंकन, ग्रामपंचायत ठराव आणि प्रत्यक्ष झालेल्या कामाची पाहणी अशा विविध बाबींची तपासणी करणे आवश्यक असताना त्याबाबत प्रभावी कार्यवाही झालेली नसल्याचे ॲड. पाटील यांनी म्हटले आहे.

नोटीसमध्ये जलजीवन मिशनच्या निधीचा वापर, देयके, मोजमाप पुस्तिका, बिले, प्रत्यक्ष काम, स्थळ पाहणी तसेच सरपंच, ग्रामसेवक आणि ठेकेदार यांच्या भूमिकेबाबत आतापर्यंत कोणती कार्यवाही झाली, याचा संपूर्ण अहवाल मागविण्यात आला आहे. सात दिवसांत समाधानकारक खुलासा न झाल्यास वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जलजीवन मिशन प्राधिकरण तसेच सक्षम तपास यंत्रणेकडे गटविकास अधिकाऱ्यांच्या भूमिकेची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे तक्रारदारांनी नोटीसमध्ये स्पष्ट केले आहे.

एकाच रस्त्याला दोनदा निधी?

मात्र, माहिती अधिकारातून संबंधित कागदपत्रांची मागणी केल्यानंतर या कामाची मोजमाप पुस्तिका उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष काम किती झाले, त्याचे मोजमाप कसे झाले आणि त्यानुसार देयके कशी अदा करण्यात आली, याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या रस्त्यासाठी खर्च झालेल्या निधीचा संबंध गणेश आळी येथील रस्त्याच्या निधीशी असल्याचाही संशय तक्रारदारांनी व्यक्त केला आहे. यापूर्वीच्या शासकीय अहवालात गणेश आळीच्या रस्त्यासाठी असलेला निधी अन्यत्र वळविल्याचा उल्लेख असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे दोन्ही प्रकरणांचा परस्पर संबंध आहे का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

जर रस्ता एकच असेल तर त्यासाठी दोनदा निधी का खर्च झाला? दोनदा काम दाखवले असेल, तर त्याची मोजमाप पुस्तिका कुठे आहे? प्रत्यक्ष काम आणि कागदोपत्री कामात तफावत आहे का? आणि जनतेच्या पैशाचा नेमका वापर कुठे झाला?

ही कोणाविरुद्धची वैयक्तिक मोहीम नाही. हा जनतेच्या पैशांचा आणि शासकीय निधीच्या पारदर्शक वापराचा प्रश्न आहे. एकाच कामासाठी दोनदा निधी खर्च झाला असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. जनतेच्या करातून जमा झालेल्या प्रत्येक रुपयाचा हिशोब मिळालाच पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका प्रतिक कणगी आणि राजेश तरे यांनी मांडली.

आता पंचायत समिती मुरुड प्रशासन या आरोपांची कितपत गंभीर दखल घेते, याकडे बोर्ली ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. चौकशी झाली तर एकाच रस्त्याच्या नावाखाली झालेल्या निधीच्या वापराचे खरे चित्र समोर येण्याची शक्यता आहे.

शिव्या देतात म्हणून सुधारणार नाही!

तक्रारी, महिलांना रोजगारासाठी घ्यावी लागणारी संमती आणि वेतनातील असमानता यासह अनेक मुद्दे मांडले. महिलांच्या प्रश्नांकडे केवळ सहानुभूतीने नव्हे, तर समानतेच्या दृष्टीने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बलात्कार आणि महिलांबाबत काही राजकीय नेत्यांनी केलेल्या वक्तव्यांचा संदर्भ देत राहुल गांधी यांनी अशा विचारांना घाणेरडी मानसिकता संबोधले. महिलांनी गप्प बसावे, त्यांनी मर्यादेतच राहावे आणि पुरुषांना मात्र अमर्याद स्वातंत्र्य असावे, हा विचारच बदलला पाहिजे, असे ते म्हणाले.

आम्हाला असा हिंदुस्थान नको, जिथे मुलींना पिंजऱ्यात कोंडले जाते आणि मुलांना काहीही करण्याची मुभा असते. आम्हाला आदर हवा आहे आणि तो प्रत्येकासाठी समान हवा आहे, असे राहुल गांधी यांनी ठणकावून सांगितले.

या आक्रमक भूमिकेमुळे 'छात्रो की गुंज'चा कार्यक्रम केवळ विद्यार्थी संवाद न राहता केंद्र सरकारच्या धोरणांवर आणि महिलांच्या सामाजिक स्थानावरून काँग्रेस विरुद्ध भाजप संघर्षाचे नवे व्यासपीठ ठरल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

महामार्गावर नडगाव हद्दीत दरड कोसळली

कार्यवाहीमुळे मोठी दुर्घटना टळली. पावसाळ्यात महामार्गाच्या डोंगर उतारांवरून दरड कोसळण्याचा धोका वाढला असून, वाहनचालकांनी अशा ठिकाणी सावधगिरीने प्रवास करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

कौटुंबिक वादातून मारहाण

त्यांच्या डोक्यात दोन ते तीन वेळा प्रहार केला. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सहायक फौजदार राजेश माने करीत आहेत.

ऐन सणासुदीत महागाईचा नारळ!

तिथं केवळ ५५ ते ६० नारळ मिळात असल्यानं नारळाची आवक घटली आहे. त्यामुळं नारळ, खोबरे आणि खोबरेल तेलाचं भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. ३० ते ५० रुपयांचे नारळ आता ४० ते ६० रुपये, तर घरामध्ये वापरले जाणारे सुके खोबरे चारशे रुपये किलोपर्यंत पोहोचले आहे. खोबरेल तेलही दुपटीनं महाग झालं आहे. भाजीसाठी लागणाऱ्या शेंगदाणा तेलापासून खोबरेल तेल दुपटीनं महाग झाले आहे. अडीचशे ग्रॅम खोबरेल तेलाची बाटली तब्बल १९२ रुपयांना मिळत आहे. गणेशोत्सव जवळ आल्यामुळं नागरिकांना नारळ, सुके खोबरे आणि खोबरेल तेल चढ्या भावानं विकत घ्यावं लागत आहे.

शहाळेदेखील महागले

आरोग्यवर्धक असलेलं शहाळेदेखील ७० रुपये नग झाल्यानं ग्राहकांच्या खिशाला कात्री लागत आहे. कमी पाण्याचे शहाळे ५० ते ६० रुपयांना, तर मलई असलेले शहाळे ८० ते ९० रुपयांना मिळत आहे. दिवाळीपर्यंत नव्याने नारळाचे चांगले पीक आल्यानंतर भाव कमी होण्याची शक्यता असल्याचे नारळ व्यावसायिक गोरख पाटील यांनी सांगितले.

ग्रामसेवकांच्या हजेरीवर आता 'डिजिटल' लक्ष!

उपस्थित आहेत की नाही, हे आता ग्रामविकास विभागाच्या आदेशामुळे शोधणे शक्य होणार आहे. तसेच जीपीएस प्रणालीमुळे संबंधित अधिकारी नेमक्या कार्यक्षेत्रात आहेत की नाही, याची माहिती उपलब्ध होणार आहे. यासह बायोमेट्रिक हजेरीमुळे संबंधितांची प्रत्यक्ष उपस्थितीची डिजिटल नोंद ठेवली जाणार आहे.

ग्रामसेवकांची जीपीएस आणि बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी घेण्याचा निर्णय यापूर्वीही घेण्यात आला होता. मात्र, त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या. त्यामुळे ग्रामविकास विभागाने पुन्हा एकदा जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. ग्रामविकास विभागाचे कक्ष अधिकारी नितीन पवार यांनी याबाबत पत्र काढून ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची जीपीएस आणि बायोमेट्रिक प्रणालीद्वारे हजेरी सुनिश्चित करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

ग्रामसेवकांची उपस्थिती निश्चित झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयातील कामकाज अधिक गतिमान होण्याची अपेक्षा आहे. दाखले, प्रमाणपत्रे आणि विविध शासकीय योजनांच्या कामांसाठी ग्रामस्थांना वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. या प्रणालीमुळे ग्रामसेवकांच्या उपस्थितीची डिजिटल नोंद उपलब्ध होणार असल्याने अनधिकृत गैरहजेरीला आळा बसण्याची शक्यता आहे. आता या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत प्रभावी होते, याकडे ग्रामस्थांसह प्रशासनाचे लक्ष राहणार आहे.

चेक बाऊन्सच्या वादातून जीवे मारण्याची धमकी

| पेण | प्रतिनिधी |

हातउसने दिलेल्या पैशांच्या परतफेडीवरून सुरू असलेल्या वादाचे पडसाद पेण न्यायालयाबाहेर उमटले. चेक बाऊन्स प्रकरणाच्या तारखेला न्यायालयाबाहेर पैशांवरून झालेल्या वादातून एका व्यक्तीला लाकडी काठीने मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना २१ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता घडली.

फिर्यादी आणि आरोपींमध्ये पैसे परत करण्याबाबत चर्चा सुरू असताना आरोपींनी हुज्जत घालून अरेरावी केली. आरोपी क्रमांक एकने शिवीगाळ करून तेथून निघून जाण्यास सांगितले आणि मारण्यासाठी माणसे बोलावण्याची धमकी दिली.

फिर्यादीने शिवीगाळीचा जाब विचारल्यानंतर आरोपीने रस्त्याच्या बाजूला पडलेली लाकडी काठी उचलून डोक्यात, मानेवर, कंबरेत आणि उजव्या पायावर मारहाण केली. आरोपी क्रमांक दोन आणि त्याच्यासोबत असलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनीही लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. तसेच पेणमध्ये पुन्हा दिसल्यास जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

विद्यार्थ्यांनी इंग्रजीचा आत्मविश्वासाने वापर करावा

■ मनोहर बैले यांचे प्रतिपादन

| आगरदांडा | प्रतिनिधी |

विद्यार्थ्यांनी शालेय अभ्यासक्रमातील शिक्षणासोबतच इंग्रजी भाषेचा नियमित सराव करून तिचा आत्मविश्वासाने वापर करावा, असे प्रतिपादन सागर कन्या मच्छिमार सोसायटीचे चेअरमन तथा माजी विद्यार्थी मनोहर बैले यांनी केले. मुरूड जंजिरा नगरपरिषद मराठी शाळा क्रमांक १ मधील ९३ विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरणाच्या पुस्तक वाटप कार्यक्रमावेळी ते बोलत होते.

यावेळी मनोहर बैले, मुख्याध्यापक राजेश भोईर, उत्कृषा रणदिवे, मनोहर मकु, अविनाश ठाकूर, सुनील पवार, कविता मकु, शिवानी रणदिवे, अनुष्का डोलकुलकर, प्रचिती गुंजाळ व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेला पुष्पहार अर्पण करून पूजन करुन सुरुवात करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक राजेश भोईर यांनी माजी विद्यार्थी मनोहर बैले यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मनोहर बैले यांनी स्वखर्चाने १ ते ८ वीच्या ९३ विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरणाच्या पुस्तकांचे वाटप केले.

यावेळी मनोहर बैले पुढे म्हणाले की, इंग्रजी ही आजच्या स्पर्धात्मक युगातील आवश्यक भाषा बनली आहे. इंग्रजी बोलताना चुका होतील या भीतीने विद्यार्थ्यांनी मागे राहू नये. दैनंदिन संभाषणात इंग्रजीचा वापर केल्यास भाषेवरील प्रभुत्व आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.

मुख्याध्यापक राजेश भोईर यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरणाची पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. या पुस्तकांचा विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचा पाया मजबूत करण्यासाठी तसेच व्याकरणाचे ज्ञान आत्मसात करण्यासाठी मोठा उपयोग होणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाबद्दल आवड निर्माण होऊन त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस निश्चितच हातभार लागेल.

वाहतूक नियम तोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

अलिबाग : वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात रायगड पोलिसांनी २१ ऑगस्ट रोजी धडक कारवाई केली. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वाहतूक शाखेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केलेल्या कारवाईत एकूण ३१७ जणांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. या कारवाईत नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांकडून ३ लाख २५ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. वाहतुकीचे नियम पाळावेत आणि रस्त्यावरील अपघातांना आळा बसावा, यासाठी पोलिसांकडून नियमितपणे ही कारवाई करण्यात येत आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, मौजे-कारिवणे, ता.रोहा, जि.रायगड येथील खालील व्यक्तीचे नावे असलेली ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची खालील वर्णनाची रोहा नगरपरिषद हद्दीतील जमिन मिळकत आमचे अशिलांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

शेतजमिनीचे वर्णन

मौजे-कारिवणे, ता.रोहा, जि.रायगड येथील सर्व्हे नं.१७/अ/१ मधील एकूण क्षेत्र हे.आर.पॉ.१३-७८-७० पैकी खालील वर्णनाची शेतजमिन

अ. क्रं.	कब्जेदाराचे/ मालकाचे नाव	खाते नं	सर्व्हे नं.	हिस्सा	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार
१.	श्री.संतोष जनार्दन देशमुख	१५९	१७	अ/१	१-६०-००	
२.	श्री.राजेंद्र हरिश्चंद्र पवार				पो.ख.०-४०-००	०.१४
३.	श्री.सचिन वसंत पाटील				एकूण २-००-००	

सबब वर नमुद शेत जमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत हक्क, हितसंबंध स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात, अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल यांची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : २४/०८/२०२६

सही/-
ॲड.सानिया सचिन शिंदे
ऑफिस-गाळा नं.२८, सिटी पार्क बिल्डींग,
खान्देश हॉटेलसमोर, साई इंटरप्रायझेस, से.१३,
खांदा कॉलनी, नवीन पनवेल(प),
ता.पनवेल-४१०२०६, जि.रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक वर्षा उमेश शिंगाडे यांचेकडून विकत घेण्याचे निश्चित केले आहे. वर नमूद मिळकत निर्वेध असल्याची माहिती विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेली आहे.

मिळकतीचे वर्णन

भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे. आर.चौ.मी.	आकार रू. पैसे.
८०१	०-०२-८०	०.५२

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, दावा, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा वाटाघाटी पुर्ण करून मिळकतीचे खरेदीखत माझे अशिलांचे लाभात करून घेतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि. २३/०८/२०२६

ॲड. आर. व्ही. ओक
''गुरूकृपा'', महर्षी कर्वे रोड
अलिबाग-रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांना याद्वारे असे सूचित करण्यात येत आहे की, जिल्हा रायगड तालुका अलिबाग पैकी गाव चेंढरे येथील खालील वर्णनाची मिळकत मे. उत्कर्ष समूह तर्फे भागीदार - तुषार शिवराम पाटील वगैरे १० यांचे मालकीची आहे.

गट/ सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र	आकार
६८	१	०-६७-६०	१४=२५

सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्यास आणि टायटल सर्टीफिकेट देण्यास मे. उत्कर्ष समूह तर्फ भागीदार यांनी खाली सही करणार यांस कळविले आहे. त्याकरिता सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येत आहे की, वर नमूद ७/१२ उताऱ्यावर नाव असणाऱ्या व्यतिरिक्त इतर कोणाचाही सदर मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यक्तीची मालकी हक्काबाबत हरकत/तक्रार असल्यास सदर व्यक्तीने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत खाली सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रांसह नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास इतर योग्य ती पूर्तता करून वर नमूद केल्यानुसार टायटल दाखला दिला जाईल आणि त्यानंतर आलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : २३/०८/२०२६

सही/-
ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग- रायगड.
मोबाईल: ९२७०१६२९२९

जाहीर नोटीस

सर्व लोकांना याद्वारे असे सूचित करण्यात येत आहे की, जिल्हा रायगड तालुका अलिबाग पैकी गाव चेंढरे येथील खालील वर्णनाची मिळकत ज्योती प्रविण घरत वगैरे १२ यांचे मालकीची आहे.

गट/ सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र	आकार
६८	२	०-०१-१०	०=२२

सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्यास आणि टायटल सर्टीफिकेट देण्यास वर नमूद मिळकतीच्या मालकांनी खाली सही करणार यांस कळविले आहे. त्याकरिता सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येत आहे की, वर नमूद ७/१२ उताऱ्यावर नाव असणाऱ्या व्यतिरिक्त इतर कोणाचाही सदर मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यक्तीची मालकी हक्काबाबत हरकत/तक्रार असल्यास सदर व्यक्तीने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत खाली सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रांसह नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास इतर योग्य ती पूर्तता करून वर नमूद केल्यानुसार टायटल दाखला दिला जाईल आणि त्यानंतर आलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : २३/०८/२०२६

सही/-
ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग- रायगड.
मोबाईल: ९२७०१६२९२९

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ. क्र.	संचिका क्र.	गाव व निवाडा क्र.	सर्व्हे क्र.	संपादित क्षेत्र	मंजूर पात्रता (चौ.मी.)	वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती
नोड _JNPT_ द्रोणागिरी								
१	JNPT-१५८	जसखार १७/४२	२९९/०	३-६९-०	२३७० चौ.मी.	नोड जे.एन.पी.टी. ब्लॉक क्र. ०४ सेक्टर-०५, भूखंड क्र. १३, क्षेत्र-२३७० चौ.मी.	**अ) कै. जुबेदा खातुन ए. अजिज तुंगेकर उर्फ जुबेदा गुलाम मोहम्मद शेकबिकन (मयत)** १. अशफाक गुलाम मोहम्मद शेकबिकन २. मुन्नवरा बेगम मोहम्मद मुनीर शेकबिकन ३. निलोफर तोहिद अ. सोंडे वारस दाखला क्र. CMA/२५२/२०१६ **अ) कै. अशफाक गुलाम मोहम्मद शेकबिकन (मयत) यांचे वारस** १. निलोफर तोहिद अ. सोंडे वारस दाखला क्र. CMA/२८/२०२१	सक्षम न्यायालयाने घोषित केलेले वारस पात्र भूधारक **१. मुन्नवरा बेगम मोहम्मद मुनीर शेकबिकन** **२. निलोफर तोहिद अ. सोंडे** यांच्या नावे भूखंड वाटपाचे प्रस्तावित आहे.
		एकुण संपादित क्षेत्र		३-६९-०				

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितानी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण)
सिडको भवन, तळ मजला, भूमि विभाग १२.५०%
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (जेएनपीए)
सिडको/जनसंपर्क/२०१/२०२६-२७

दुरशेत पुलाची गंभीर अवस्था

| पेण | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील दुरशेत येथील बाळगंगा नदीवर असलेल्या पुलाची गंभीर अवस्था झाली आहे. या पुलाच्या दुरूस्तीची मागणी तत्कालीन सरपंच दशरथ गांवड यांनी तत्कालीन लोकप्रतिनिधींकडे केली होती. या पुलाच्या कामाला जुलै २०२३ ला पुरवणी अर्थ संकल्पामध्ये मंजूरी देखील मिळाली आहे. या कामाला अर्थ संकल्पीय तरतूद ११.०९ कोटींची आहे. परंतु, स्थानिक राजकारणामुळे तसेच खरोशी आणि दुरशेत या गावातील समन्वयाच्या आभावामुळे या पुलाचे काम अद्याप सुरुच झालेले नाही.

दुरशेतचे तत्कालीन सरपंच दशरथ गांवड यांनी बाळगंगा नदीवरील दुरशेत ते खरोशी या दरम्यान असलेल्या जीर्ण पुलाची दुरुस्ती अथवा नव्याने पुल बांधण्याची मागणी तत्कालीन आमदारांकडे केली होती. परंतु,

- **संकल्पीय तरतूद असूनही काम रखडले**
- **गंजलेला लोखंडामुळे अनेकांना दुखापत**

स्थानिक राजकारणामुळे व खरोशी आणि दुरशेत या गावातील समन्वयाच्या आभावामुळे या पुलाचे काम सुरुच झाले नाही. महत्त्वाची बाब म्हणजे जुलै २०२३ ला पुरवणी अर्थ संकल्पामध्ये या पुलाच्या कामाला मंजूरी देखील मिळाली आहे. या कामाला अर्थ संकल्पीय तरतूद ११.०९ कोटींची असून, या पुलाचे काम आतापर्यंत पुर्ण व्हायला पहिजे होते. परंतु, स्थानिक पातळीवरील असमर्थनामुळे हे काम पूर्ण होऊ शकले नाही. दोन दिवसांपूर्वीच जुन्या जीर्ण पुलाचा कठडा तुटून पडला आहे. सुदैवाने यात होणतीही जिवीत हानी झाली नसली तरी भविष्यात मोठा अपघात होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. या पूर्वी पुलाचा गंजलेला पत्रा आणि लोखंडामुळे अनेक जणांना दुखापत झाली आहे.

या पुलामुळे खरोशी व दुरशेत ही दोन्ही गावे जोडली गेली आहेत. या पुलावरून विद्यार्थी, शेतकरी आणि स्थानिक ग्रामस्त ये-जा करीत असतात. मात्र, नुकताच कोसळलेल्या पुलाच्या कठड्यामुळे मोठा अपघात होण्याची भिती वर्तविली जात आहे. या पुलामुळे स्थानिकांसह नवरात्रीच्या काळात खरोशी येथील केळंबा देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना होणार आहे. ११.०९ कोटींची तरतूद असतानाही काम रखडणे ही गंभीर बाब असून, प्रशासनाने याची दखल घेऊन पुलाचे काम युद्ध पातळीवर सुरू करावे, अशी मागणी दशरथ गावंड यांच्यासह नागरिकांनी केली आहे.

समन्वयाच्या अभावामुळे काम रखडले

दुरशेत ते खरोशी या गावांना जोडणाऱ्या बाळ गंगानदीवरील जीर्ण पुलाकडे प्रशासनाचे आणि संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे, या पुलाच्या दुरुस्ती अथवा नव्याने पूल बांधण्याची मागणी २०२१ मध्येच दुरशेतचे तत्कालीन सरपंच दशरथ गांवड यांनी शासन तसेच तत्कालीन आमदारांकडे केली होती. मात्र, स्थानिक पातळीवरील राजकारण आणि दुरशेत व खरोशी या दोन्ही गावांमधील समन्वयाच्या अभावामुळे पुलाचे काम प्रत्यक्षात सुरू होऊ शकले नसल्याचे सांगितले जात आहे.

११.०९ कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद

जुलै २०२३ च्या पुरवणी अर्थ संकल्पात या पुलाच्या कामाला मंजुरी मिळाली असून, त्यासाठी तब्बल ११.०९ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. परंतु, मंजुरी मिळूनही अद्याप कामाला सुरुवात झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी या जुन्या जीर्ण पुलाचा कठडा तुटून नदीत कोसळला आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र, पुलाची अवस्था अत्यंत धोकादायक झाली असून, यापूर्वीही पुलावरील गंजलेलेपत्रे व लोखंडी भाग तुटल्याने अनेकांना दुखापत झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

निवडक

एकल महिला नोंदणीचे आवाहन

रायगड : अलिबाग नगर परिषदेच्यावतीने एकल महिला नोंदणी अभियान सुरू करण्यात आले आहे. शहरातील एकल महिलांनी नगरपरिषदेच्या कार्यालयामध्ये एकल महिला असल्याबाबत तात्काळ नोंदणी करावी, असे आवाहन अलिबाग नगरपरिषदेच्यावतीने करण्यात आले आहे. नोंदणीसाठी अंतिम मुदत दि.२७ ऑगस्टपर्यंत असल्याचे सांगण्यात आले आहे. ही मोहिम अलिबाग नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, मुख्याधिकारी सागर साळुंखे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती. डॉ. साक्षी पाटील आणि उपसभापती ॲड. अश्विनी ठोसर यांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेण्यात आली आहे. अलिबाग नगरपरिषद हद्दीतील एकल महिला म्हणजेच विधवा पतीचे निधन झालेल्या महिला, घटस्फोटीत पतीपासून कायदेशीररित्या विभक्त झालेल्या महिला, परित्यक्ता पतीकडून सोडचिठ्ठी न देता किंवा बेवारस सोडलेल्या (त्याग केलेल्या) महिला, अविवाहित लग्न न केलेल्या व वयाने मोठ्या असणाऱ्या एकट्या महिला, दिव्यांग किंवा इतर शारीरिक दृष्ट्या अपंग किंवा संकटात एकट्या जीवन जगणाऱ्या महिलांनी नगर परिषदेच्या कार्यालयात नोंदणी करावी. नोंदणीकरिता अंतिम दि.२७ ऑगस्ट असून, अलिबाग नगरपरिषद हद्दीतील एकल महिलांनी जास्तीत जास्त सहभाग घेऊन नोंदणी पूर्ण करावी. तसेच, या नोंदणीत सहभाग घेऊन सर्व पात्र महिलांनी सहकार्य करावे. आणि अधिक माहितीसाठी अलिबाग नगरपरिषद कार्यालयास भेट द्यावी, असे आवाहन नगरपरिषदेच्यावतीने करण्यात आले आहे.

मोफत शालेय साहित्य वाटप

पाली : सुधागड तालुक्यातील तिवरे येथील भारत फार्म्सचे मालक हितेन दलाल यांच्या माध्यमातून कानसळ येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत अंगणवाडीतील छोट्यांपासून ते पदवीधर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनाच उपयुक्त शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गुल अडवाणी, मेहेक अडवाणी, जयेश व्होरा, भारत फार्म्सचे प्रतिनिधी गंगाराम दळवी यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आशिष किसन उमटे, उपाध्यक्ष संतोष माने, सदस्य शर्मिला खानेकर, अनिता धनिवले, रेखा जेधे, ग्रामपंचायत सदस्या पल्लवी दळवी, पोलीस पाटील राहुल कांबळे, अंगणवाडी सेविका आश्विनी दळवी, आशा दापसे, संदिप हिंगणे, मीना मौदेकर, सिद्धांत गायकवाड, निशांत पवार, तसेच मर्चंट नेव्हीत कार्यरत असलेले माजी विद्यार्थी सुरज नलावडे यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

मोफत नेत्रतपासणी शिबीर

आपटा : रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आणि नवीन पनवेल येथील आर. झुंझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात एकूण ५६ नागरिकांनी मोफत नेत्र तपासणीचा लाभ घेतला. त्यापैकी ११ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असून, त्यांना पुढील उपचारासाठी शंकरा आय हॉस्पिटल येथे नेण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या ग्रुप ग्रामपंचायत वासांबेच्या सरपंच उमा मुंढे उपस्थित होत्या.

पथविक्रेता निवडणूक जाहीर

आगरदंडा : मुरूड-जंजिरा नगरपरिषद पथविक्रेता निवडणूक २०२६-२७ करिता निवडणूक जाहीर झाली आहे. ८ सदस्यांकरिता दि.९ सप्टेंबरला मतदान होणार आहे. या निवडणूकीत शहरातील अधीकृत २५५ नगर पथविक्रेते मतदान करणार आहेत. दि.२४ ते २५ ऑगस्ट रोजी मुरूड-जंजिरा सभागृहात नामनिर्देशन पत्राचे वाटप करणे, दि.३१ ऑगस्ट रोजी नामनिर्देशन पत्र स्विकारणे, दि.२ सप्टेंबर रोजी प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे आणि तद्नंतर प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिद्ध करणे, दि.३ सप्टेंबर रोजी आक्षेप अर्ज स्विकारणे आणि तद्नंतर वैद्य उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे, दि.४ सप्टेंबर रोजी शनपत्र मागे घेणे आणि तद्नंतर अंतिम यादी प्रसिद्ध करणे, दि.९ सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुरूड-जंजिरा सभागृहात मतदान घेतले जाणार असून, सायंकाळी ६ वाजल्यापासून मतमोजणी घेतली जाणार आहे. मतमोजणी संपल्यानंतर तात्काळ निवडणूक निकाल जाहीर केला जाणार आहे.

'नाट्यगृहाचे रखडलेले कामे पूर्ण करणार'

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत नगरपरिषदेकडून राबवण्यात आलेल्या आमराई परिसरातील खुले नाट्यगृह मागील अनेक वर्षे दुरुस्तीच्या कामासाठी बंद आहे. मात्र, या प्रकल्पाचे काम अनेक वर्षानंतर देखील अपूर्णच राहिले आहे.त्यामुळे या प्रकल्पाला चालना देण्यासाठी नगरपरिषद कडून प्रकल्पाची पाहणी करण्यात आली.

शहरातील उल्हास नदीलगत आमराई परिसरात खुले नाट्यगृह आहे. तत्कालीन आमदार सुरेश लाड यांच्या माध्यमातून नाट्यगृहाची निर्मिती झाली होती. त्या नाट्यगृहाच्या जागी नव्याने क्रीडा नगरी उभारण्याचे काम कर्जत नगरपरिषदेकडून सुरू करण्यात आले आहे. आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून खुले नाट्यगृहाचे सुशोभिकरण आणि जोडीला क्रीडा नगरी उभारण्याचे काम मंजूर झाले. मात्र, त्या निधीमधून प्रेक्षक गॅलरी उभी राहिली आहे. या ठिकाणी असलेल्या नाट्यगृहाचे काम रखडले असून, त्या कामाला १२ वर्षानंतर चालना देण्यासाठी विद्यमान सदस्य मंडळाने प्रयत्न सुरू केले आहेत. अनेक वर्षे रखडलेल्या आमराई नाट्यगृह-क्रीडानगरीची पाहणी कर्जत नगरपरिषद कडून करण्यात आली. आमराई क्रीडानगरी आणि नाट्यगृह या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला चालना देण्यासाठी नगरपरिषदेने पाहणी केली. यावेळी नगराध्यक्ष पुष्पा दगडे, मुख्याधिकारी तानाजी चव्हाण आणि गटनेते नगरसेवक महेंद्र चंदन, अशोक राऊत, कुमेश मोरे, नेहा शिंदे, सुमिता गायकवाड अनेक नगरसेवक उपस्थित होते. या प्रकल्पाची पाहणी सुरू असताना सत्ताधारी कर्जत परिवर्तन आघाडीचे नेते सुधाकर घारे यांनी भेट दिली. यावेळी जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती नारायण डामसे, राष्ट्रवादी तालुकाप्रमुख दीपक श्रीखंडे, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, पंकज पाटील, सोमनाथ पालकर, अतुल कडू आदी उपस्थित होते.

दिघी सागरी ठाण्यात शांततेचा निर्धार

| दिघी | प्रतिनिधी |

दिघी सागरी पोलीस ठाण्यात दहीहंडी, ईद-ए-मिलाद आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रविवारी (दि.२३) शांतता समितीची बैठक पार पडली. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी व उपनिरीक्षक भास्कर गच्छे यांनी परिसरातील परिस्थितीचा आढावा घेत सण-उत्सव शांततेत आणि सामाजिक सलोखा राखून साजरे करण्याचे आवाहन केले. यावेळी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था, मिरवणुका, धार्मिक कार्यक्रम तसेच परिसरातील विविध स्थानिक समस्यांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत मोकाट गुरांचा प्रश्नही ऐरणीवर आला. गावातील रस्त्यांवर तसेच सार्वजनिक ठिकाणी मोकाट गुरांमुळे नागरिकांना त्रास होत असून, वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याबरोबरच अपघाताची शक्यता वाढत असल्याची बाब उपस्थित करण्यात आली. या समस्येवर ग्रामपंचायत आणि पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून ठोस उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घेण्याचे यावेळी ठरविण्यात आले. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधण्यात येणार आहे. या बैठकीला परिसरातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध समाजांचे अध्यक्ष, उत्सव कमिटीचे सदस्य, पोलीस पाटील तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

शिवतेजच्या रक्तदान शिबिराला प्रतिसाद

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील शिवतेज मित्र मंडळाच्यावतीने येथील उपजिल्हा रुग्णालयात रविवारी (दि.२३) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या सामाजिक उपक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला असून, एकूण ७९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्यामध्ये ७३ पुरुष आणि ६ महिलांचा समावेश होता. हे शिबीर अलिबाग येथील जिल्हा शासकीय रक्तकेंद्राच्या तांत्रिक सहकार्याने पार पडले. या शिबीराचे आयोजन वाढती रक्ताची गरज लक्षात घेता, रुग्णांना वेळेवर रक्त मिळावे आणि समाजात जनजागृती व्हावी या

उद्देशाने करण्यात आले होते. या यशस्वी आयोजनाबद्दल अलिबाग शासकीय रक्तकेंद्राच्यावतीने मंडळाला गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी परिसरातील अनेक नागरिक, मंडळाचे कार्यकर्ते व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, शिबीरात सहभागी झालेल्या रक्तदात्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ''आपल्या रक्ताची एक बाटली कोणाचा तरी जीव वाचवू शकते, ही जाणीवच आम्हाला रक्तदान करण्यासाठी प्रेरित करते.प्रत्येकाने नियमितपणे रक्तदान केले पाहिजे.''

विद्यार्थ्यांना शिबिरातून मार्गदर्शन

आगरदांडा : तालुका विधी सेवा समिती, मुरूड व तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अंजुमन इस्लाम जंजिरा सिद्दी जाफर शेखानी मेमोरियल प्रायव्हेट आयटीआय येथे विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जनजागृती निर्माण करणे, तसेच विविध सामाजिक समस्यांविषयी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिवाणी न्यायाधीश घनःशाम तिवारी, मुख्याध्यापक इश्तियाक घलटे, वकील बार असोशिएन सचिव ॲड. डी.एन. पाटील, ॲड. फैसल जमादार आणि ॲड. इकरा शेखानी आदी मान्यवर उपस्थित होते.

तीस रक्तदात्यांनी केले रक्तदान

नेरळ : राजा शिवछत्रपती परिवाराच्यावतीने नेरळ येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरसाठी कर्जत प्रेस असोसिएशन, कर्जत फोटोग्राफर असोसिएशन आणि सुमती चिंतामणी टिपणीस महाविद्यालय यांनी सहकार्य केले होते. या रक्तदान शिबिरात ३० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक उपक्रमात सहभाग घेतला. रायगड हॉस्पिटल ब्लड बँकच्यावतीने रक्त संक्रमण करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन संतोष पेरणे, कैलास म्हामले, मनोज भोईर, प्रा. खरात, निलेश ठोंबरे यांच्या हस्ते झाले.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

शिक्षणानेच समाजाचा खरा विकास होतो आणि गुणवंत विद्यार्थी हेच भावी समाजाचे शिल्पकार आहेत. या विचाराला उजाळा देत श्रीवर्धन येथील कुणबी समाज मंदिर, ग.स. कातकर सभागृहात कुणबी समाजोन्नती संघ श्रीवर्धन तर्फे विद्यार्थ्यांचा गुण गौरव सोहळा आणि करिअर मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी इयत्ता १० वी, १२ वी तसेच विविध शाखांच्या पदवी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या कुणबी समाजातील गुणवंत मुला-मुलींचा विशेष सन्मान करण्यात आला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, गौरवपत्र आणि शैक्षणिक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान,

केवळ सत्कारच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस योग्य दिशा मिळावी यासाठी करिअर मार्गदर्शन सत्राचे खास आयोजन करण्यात आले होते. बदलत्या शैक्षणिक पद्धती, डिजिटल युगातील रोजगाराच्या नवीन संधी, स्पर्धा परीक्षांची तयारी आणि व्यावसायिक अभ्यासक्रम या विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले. या सोहळ्याला तालुक्यातील कुणबी समाजातील नागरिक, ज्येष्ठ समाजश्रेष्ठ, विविध क्षेत्रांतील मान्यवर, संघटक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

शेतकरी मित्रासाठी अर्जाचे आवाहन

| तळा | प्रतिनिधी |

तळा तालुक्यातील शेतकऱ्यांनी आत्मा योजनेंतर्गत शेतकरी मित्र निवडीसाठी अर्ज करण्याचे आवाहन कृषी विभागाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. तळा तालुक्यात शेतकरी मित्रांची निवड करण्यात येणार आहे. तालुक्यातील मंजूर १२ सहाय्यक कृषी अधिकारी सजा/कार्यक्षेत्रनिहाय एक शेतकरी मित्र अशा एकूण १२ शेतकरी मित्रांची निवड करण्यात येणार आहे. एकूण १२ शेतकरी मित्रांच्या निवडीसाठीचा अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि.२७ ऑगस्ट असणार आहे.

दोन वर्षांतच रस्त्याची दुर्दशा | **धोकादायक मोरीकडे दुर्लक्ष**

नवघर-पेडली रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

| पाली/वाघोशी | प्रतिनिधी |

नवघर ते पेडली या महत्त्वाच्या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून, रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या प्रचंड खड्ड्यांमुळे नागरिकांचा प्रवास जीवघेणा ठरत आहे. या रस्त्याला अवघी दोन वर्षे पूर्ण झाली असतानाच रस्त्याची झालेली दुरवस्था प्रशासनाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ठरत आहे. रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात संतप्त ग्रामस्थांनी रस्त्यावर उतरून आपल्या व्यथा मांडल्या असुन,

शासनाने तातडीने या प्रश्नाकडे लक्ष न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

सुधागड तालुक्यातील नवघर ते पेडली हा महत्त्वाचा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून साकारण्यात आला होता. मात्र, अवघ्या दोन वर्षात या रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. या रस्त्याला आवश्यक असलेल्या साईडपट्ट्या अद्याप पूर्ण करण्यात आलेल्या नाहीत. परिणामी पावसाळ्यात रस्त्याच्या कडेला चिखल निर्माण होत असुन, वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मागील काळात काही ठिकाणी खड्डे भरण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. एवढेच नव्हे तर काही समाजसेवकांनी प्रशासनाची वाट न पाहता श्रमदानातून स्वतः खड्डे बुजवले होते. मात्र, पावसामुळे पुन्हा त्याच ठिकाणी चिखल आणि खड्ड्यांची परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच, या रस्त्यावरील एका मोरीची अवस्था अत्यंत गंभीर आहे. मोरीचे काम अपूर्णावस्थेत असुन, ती वाहनचालकांच्या सहज लक्षात येत नाही. मोरीलगतच रस्त्याच्या बाजूला मोठा खड्डा पडलेला असल्याने एखादे वाहन घसरून मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी हा भाग अधिक धोकादायक ठरत असून, एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान, दोन वर्षांत रस्त्याची अशी अवस्था होत असेल, तर रस्ता बांधताना झालेल्या कामाची गुणवत्ता तपासली होती का? साईडपट्ट्या का पूर्ण करण्यात आल्या नाहीत? धोकादायक मोरीचे काम अपूर्ण का ठेवण्यात आले? असे अनेक प्रश्न आता ग्रामस्थांकडून उपस्थित केले जात आहेत. त्याचबरोबर शासनाने या रस्त्याची तातडीने पाहणी करून सर्व खड्डे बुजवावेत, साईडपट्ट्या पूर्ण कराव्यात, धोकादायक मोरीचे काम तातडीने पूर्ण करावे आणि रस्त्याच्या कामाची गुणवत्ता तपासावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा स्पष्ट इशारा देखील ग्रामस्थांनी दिला आहे.

उत्सवाच्या पार्श्वभूमीवर बैठक

| रसायनी | प्रातिनिधी |

रसायनी : आगामी ईद-ए-मिलाद उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रसायनी पोलीस ठाण्यात शनिवारी (दि.२२) शांतता कमिटी व मोहल्ला कमिटी सदस्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ईद-ए-मिलाद उत्सव शांततेत, सलोख्याच्या आणि सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा करण्याबाबत पोलीस प्रशासनाकडून आवश्यक सूचना देण्यात आल्या. मिरवणुकीदरम्यान शिस्त व शांतता राखणे, कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणे, अफवा अथवा चुकीच्या माहितीवर विश्वास न ठेवणे तसेच सोशल मीडियावर आक्षेपार्ह किंवा अफवाजनक संदेश प्रसारित न करण्याचे आवाहन रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांनी बोलताना सांगितले. तसेच, ध्वनिक्षेपकासह शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे. कोणताही अनुचित प्रकार किंवा संशयास्पद घटना निदर्शनास आल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. या बैठकीस शांतता कमिटी व मोहल्ला कमिटीचे एकूण १५ सदस्य उपस्थित होते.

उडाली गाळण

राहुल गांधी विरोधी पक्षनेते म्हणून अधिकाधिक आक्रमक होताना दिसत आहेत. आणि, महत्वाचे म्हणजे, बारा वर्षात टर्रेबाजपणे राज्य करणारे मोदी व शहा यांची राहुल यांच्या नव्या अवतारापुढे गाळण उडालेली दिसते. गांधी यांनी मोदी सरकारला प्रथमतःच इतके अवघड कैचीत पकडले आहे. दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या लाठीमाराचे प्रकरण त्यांनी सोडलेले नाही. त्यात झालेल्या पॅलेट गनच्या वापराविरुध्द त्यांनी २४ जुलैला पहिली पत्रकार परिषद घेतली होती. नंतर संसद अधिवेशनात त्यांनी हा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. तिथे सरकारने सत्तेच्या जोरावर ते होऊ दिले नाही. परिणामी गेल्या आठवड्यात त्यांनी पुन्हा आंदोलन केले. साहिल कोचब नावाच्या तरुणावर २० जुलैच्या संसदेवरील मोर्चादरम्यान पॅलेट गनमधून गोळीबार करण्यात आला. त्यात शेकडो छर्रे त्याच्या शरीरात घुसले. त्यांच्या जखमा अजूनही कायम आहेत. वाईट म्हणजे यातील काही छर्रे डोळ्यात गेल्याने त्याची दृष्टी गेली आहे. एका पंचविशीच्या तरुण पोराचा डोळा अशा रीतीने जावा आणि तरीही मोदी-शहांच्या सरकारने काही घडलेच नाही असे म्हणावे ही आजची विदारक वस्तुस्थिती आहे. दिल्ली मोर्चावरील लाठीमार किंवा पॅलेट गनचा वापर याबाबत अमित शहा यांनी निवेदन करावे यासाठी विरोधकांनी संसद रोखून धरली. त्यांना घाबरून हे भाजपचे आजचे लोहपुरुष लोकसभेत पाऊलही टाकायला धजावले नाहीत. सरकारकडे याबाबत काही सांगण्यासारखे असते तर अमित शहा यांनी पत्रकार परिषदेत किंवा अन्यत्र किमान काही निवेदन नक्की केले असते. शहा यांनी नाही तर किमान दिल्ली पोलिस आयुक्तांनी ते करायला हरकत नव्हती. पण मग त्यानंतर मोर्चादरम्यान गोळीबार का झाला व कोणी तसे आदेश दिले हे प्रश्न अधिक जोराने विचारले गेले असते. सरकारला नेमके तेच दडवायचे आणि दडपायचे आहे. राहुल यांनी हाच मुद्दा पकडून ठेवला आहे. साहिल याच्यावरच्या गोळीबाराबद्दल एफआयआर दाखल व्हावा या मागणीसाठी त्यांनी शुक्रवारी पोलिस ठाणे गाठले. तो होत नाही म्हटल्यावर त्यांनी ठिय्या आंदोलन सुरु केले. आजकाल गेले की कॅमेरे असतातच. त्यामुळे काही क्षणातच बातमी देशभर पोचली. मोदींच्या भाडोत्री मिडियालाही ती दाखवावी लागली.

हुकुमशाहीची लक्षणे

राहुल तेथे दिवसरात्र बसले असते तर सर्व जगासमोर मोदी सरकारची लक्तरे निघाली असती. ती टाळण्यासाठी अखेर सरकारने संध्याकाळी एक एफआयआर दाखल केला. मात्र त्यात अज्ञात गुन्हेगाराविरुध्द तक्रार आहे. वास्तविक वीस जुलैनंतर एक महिना लोटला. सरकारने खरे तर स्वतःहून या गोळीबाराचा खुलासा करायला हवा होता किंवा त्या प्रकरणी फिर्याद नोंदवायला हवी होती. गोळीबारात साहिल व इतर अनेक तरुण जखमी झाले हे तर नक्की आहे. कारण त्यांच्यावर सार्वजनिक इस्पितळांमध्ये उपचार झाले आहेत. तेथील डॉक्टरांचे छर्रे लागल्याचे प्रमाणपत्रही आहे. समजा, हे छर्रे पोलिसांनी झाडले नाहीत असे पोलिसांचे म्हणणे असेल तर ते अधिक गंभीर आहे. कारण मोर्चाचा फायदा घेऊन अशी बंदुक कोणी चालवली याचा पोलिसांनी आजवर तपास करायला हवा होता. पण पोलिसांनी आजवर याबाबत काहीही न करणे ही सरकारच्या गुन्ह्याची कबुली आहे. काँग्रेसच्या काळात असे काही घडले असते तर गृहमंत्र्यांनाच काय कदाचित पंतप्रधानांनीही राजीनामा द्यावा लागला असता. पण मोदी व शहांच्या भीतीमुळे आणि भक्तीमुळे मिडिया व इतर लोक डोळ्यावर कातडे ओढून बसले आहेत. राहुल गांधी यांनी हा मुद्दा लावून धरला व किमान एफआयआर दाखल करणे भाग पडले. आता या प्रकरणी पोलिस तपास वेगाने व्हावा यासाठीही काँग्रेसने पाठपुरावा करणे अपेक्षित आहे. तरच राहुल यांच्या आंदोलनाला काही अर्थ प्राप्त होईल. याच दरम्यान कॉकरोच जनता पार्टीच्या नेत्यांनी स्कूल ठीक करो आंदोलनांतर्गत शाळांची पाहणी सुरु केली आहे. परवा जयपूरमध्ये त्यांच्या कार्यकर्त्यांवर भाजपच्या गुंडांनी हल्ला केला. गाड्या फोडण्यात आल्या. इकडे महाराष्ट्रात अभिजीत दीपके यांच्याविरुध्द शाळेत बेकायदा प्रवेश केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जराही विरोधाचा आवाज सहन न होणे आणि विरोधकांना पायदळी तुडवण्याची भाषा करणे हे घाबरलेल्या हुकुमशहांचे लक्षण आहे. मोदींचे भाजप सरकार आज ही लक्षणे दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्वत्र दाखवत आहे.

पुण्यातील मुलींचा आक्रोश

शनिवारी पुण्यात राहुल यांच्या छात्रों की गूंज या कार्यक्रमाच्या विरोधात भाजपशी संबंधित संघटनांनी जो तमाशा केला त्यातही हेच दिसले. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील मुलींनी या कार्यक्रमाला जाऊ नये म्हणून धमकावण्यात आले. यामागे अभाविपवाले आहेत असे मुलींनी टीव्ही वाहिन्यांना सांगितले. या वादामध्ये काँग्रेसप्रणीत विद्यार्थी संघटनेच्या लोकांना मारहाण करण्यात आली. पोलिसांनीही त्यांच्याच विरुध्द गुन्हे दाखल केले. भाजपचे देवेंद्र फडणवीसांपासून सगळे नेते राहुल गांधींविरुध्द फुत्कार टाकत होते. या एका कार्यक्रमामुळे राहुल गांधी पंतप्रधान होणार का हे ठरणार नव्हते की केंद्रात काँग्रेसचे सरकार बनणार नव्हते. सध्या कोणत्याही निवडणुका देखील नाहीत. तरीही भाजपवाले ज्या त्वेषाने राहुल यांच्या प्रत्येक गोष्टीवर तुटून पडत आहेत ते पाहता तंबू में जबरदस्त घबराहट आहे असेच म्हणावे लागेल. राहुल गांधी यांनी मुलींशी संवाद असा कार्यक्रम केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून त्याच वेळी पुणे विद्यापीठामध्ये वंदे मातरम गाण्याचा कार्यक्रम ठेवला. वंदे मातरमची सहाही कडवी गायलीच पाहिजेत असा नवा कायदा संसदेत संमत केला आहे. ते न केले तर तो राष्ट्रगानाचा अपमान ठरवला जाऊ शकतो. किंबहुना, असे खटले करता यावेत यासाठीच हे सगळे नाटक रचले आहे. त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. दिल्ली मोर्चावरील लाठीमार व पॅलेट गनचा वापर यामुळे अमित शहा बिळात जाऊन लपले होते. ते वंदे मातरमच्या प्रश्नावरून बाहेर आले व काँग्रेसला ललकारू लागले. पण आता जेन झी नावाचे जे प्रकरण आहे ते भाजपच्या हातातून गेले आहे. वंदे मातरम वगैरेंच्या नावाने त्या पिढीला भावनिक करणे आता शक्य होणारे नाही. स्वातंत्र्यलढा कोणी लढला, तेव्हा वंदे मातरम गात गात कोण तुरुंगात गेले हे या पिढीला ठाऊक आहे. तेव्हा संघ परिवार घरात बसून होता हे त्यांना माहिती आहे. शिवाय त्यांना त्यांच्या कॉलेजातल्या फीचे, फुटणाऱ्या पेपर्सचे किंवा न मिळणाऱ्या नोकऱ्यांचे प्रश्न महत्वाचे आहेत. हिंदू विरुध्द मुस्लिम किंवा काँग्रेस देशद्रोही याला ते थारा देत नाहीत. पुण्यातील राहुल गांधींच्या कार्यक्रमात कोणताही राजकीय प्रचार झाला नाही. उलट राहुल यांनी एक व्यक्ती म्हणून महिलांना प्रतिष्ठा मिळायला हवी यावरच सगळा फोकस ठेवला. मुलींना बोलू दिले. या मुली जेन झीच्याच नव्हे तर त्याही पुढच्या जेन अल्फा म्हणजे २०१२ नंतर जन्मलेल्या होत्या. सार्वजनिक बसमध्ये येणारे अनुभव किंवा आईवडिलांनी शिकण्यावर घातलेली बंधने यावर बोलल्या तेव्हा त्या व्यवस्थेविषयी बोलत होत्या. आणि भाजपला हेच सर्वाधिक गैरसोयीचे आहे.

विचार

कर्मचारीकपातीची तलवार, निर्यातवाढीची संधी

सरत्या आठवड्यातील महत्वाची बातमी म्हणजे जगातील ४० कंपन्या करणार असलेली कर्मचारीकपात. या घटनेने व्यावसायिकांमध्ये चिंता निर्माण केली असताना समोर आलेली दिलासादायक बातमी म्हणजे कर्जवसुलीसाठी अपमानास्पद भाषेच्या वापरावर निर्बंध घालण्यात आलेले निर्बंध. तिसरी दखलपात्र आर्थिक बातमी म्हणजे भारताच्या ताटातील चव जगाच्या बाजारपेठेत पोहचवण्याची उत्तम संधी समोर आली आहे.

महेश देशपांडे

सरत्या आठवड्यातील महत्वाची बातमी म्हणजे जगातील ४० कंपन्या करणार असलेली कर्मचारीकपात. या घटनेने व्यावसायिकांमध्ये चिंता निर्माण केली असताना समोर आलेली दिलासादायक बातमी म्हणजे कर्जवसुलीसाठी अपमानास्पद भाषेच्या वापरावर निर्बंध घालण्यात आलेले निर्बंध. तिसरी दखलपात्र आर्थिक बातमी म्हणजे भारताच्या ताटातील चव जगाच्या बाजारपेठेत पोहचवण्याची उत्तम संधी समोर आली आहे.

आयटीपासून बँकिंगपर्यंत, आरोग्यसेवेपासून उत्पादनापर्यंत आघाडीच्या कंपन्यांनी या वर्षी कर्मचारी कपातीची घोषणा केली आहे. एका अहवालानुसार या यादीमध्ये जगातील ४० हून अधिक मोठ्या कंपन्यांचा समावेश आहे. त्यात ॲमेझॉन, मेटा, ओरॅकल, यूपीएस, वॉलमार्ट, सिटी, डेल, व्हिसा, नायकी आणि स्टँडर्ड चार्टर्ड यासारख्या नावांचा समावेश आहे. या कंपन्या कर्मचारी कपातीसाठी 'एआय' आणि खर्चकपात यासारखी कारणे देत आहेत. काहींनी 'एआय'च्या वापरामुळे वाढलेले उत्पादन हे कर्मचारी कपातीचे मुख्य कारण असल्याचे म्हटले आहे, तर इतरांनी व्यवसायाची मंद वाढ, पुनर्रचना आणि ग्राहकांच्या बदलत्या मागण्या ही कारणे दिली आहेत. हा अहवाल कर्मचारी कपातीच्या सर्वात मोठ्या कारणांपैकी एक म्हणून 'एआय' कडे अंगुलीनिर्देश करत आहे. ब्लॉकचेन, कॉइनबेस आणि स्टँडर्ड चार्टर्डसारख्या कंपन्यांनी उघडपणे मान्य केले आहे, की कर्मचारी कपातीमागे एआय हे एक कारण बनले आहे, असा प्रश्न पडतो, कारण पूर्वी कर्मचाऱ्यांद्वारे केली जाणारी कामे आता 'एआय' करत आहे. प्रत्येक कंपनी केवळ 'एआय'मुळेच आपली कर्मचारी संख्या कमी करत नाही. काही कंपन्या व्यवसायाची पुनर्रचना आणि विशिष्ट क्षेत्रांमधील कमकुवत मागणी ही कारणे देत आहेत. २०२६ मध्ये जाहीर झालेल्या सर्वाधिक कर्मचारी कपातीच्या यादीत यूपीएस अव्वल स्थानी आहे. कंपनीने नेटवर्क पुनर्रचना आणि खर्चकपातीचा भाग म्हणून तीस हजार नोकऱ्या कमी करण्याची योजना जाहीर केली आहे. 'एआय'च्या वापरामुळे 'ओरॅकल'ने अंदाजे २१ हजार कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे.

व्यवसायाच्या गरजेनुसार कर्मचारी संख्या आणि खर्च कमी करण्यासाठी सिटी अंदाजे २० हजार नोकऱ्या, म्हणजेच त्यांच्या कर्मचारी संख्येच्या सुमारे दहा टक्के कमी करण्याची योजना आखत आहे. 'ॲमेझॉन'ने आपल्या व्यवसाय पुनर्रचना योजनेचा भाग म्हणून अंदाजे १६ हजार कॉर्पोरेट नोकऱ्या कमी केल्या आहेत. 'डेल'ने पुनर्रचना योजनेचा भाग म्हणून अंदाजे ११ हजार कर्मचाऱ्यांना, म्हणजेच एकूण कर्मचारी संख्येच्या दहा टक्के कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. 'एस्टी लॉडर' पुनर्रचना कार्यक्रमाचा भाग म्हणून दहा हजारपर्यंत नोकऱ्या कमी करण्याची तयारी करत आहे. त्यात रिटेल क्षेत्रातील कर्मचारीकपातीचा समावेश आहे. ब्रिटिश अमेरिकन 'टोबॅको' कंपनी तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी अंदाजे नऊ हजार म्हणजेच आपल्या एकूण कर्मचारी संख्येच्या सुमारे एक-पंचमांश नोकऱ्या कमी करत आहे. 'हेनेकेन' उत्पादन वाढवण्यासाठी आणि खर्च कमी करण्यासाठी पाच-सहा हजार कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याची तयारी करत आहे. 'व्हिसा'ने आपल्या 'एआय'-आधारित व्यवसाय परिवर्तनाचा भाग म्हणून अंदाजे २,६०० नोकऱ्या कमी केल्या आहेत तर 'वाईसटेक'ने अंदाजे दोन हजार कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. 'ॲटलासियन'ने अंदाजे १६०० कर्मचाऱ्यांना तर 'नायकी'ने अंदाजे १४०० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. 'क्लाउडफ्लेअर'ने 'एआय'मुळे ११०० हून अधिक कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे, तर मार्क झुकरबर्गच्या 'मेटा' कंपनीने 'एआय'मधील गुंतवणूक आणि खर्चकपातीशी संबंधित मोठ्या कर्मचारीकपातीची घोषणा केली आहे; मात्र नेमकी संख्या जाहीर करण्यात आलेली नाही.

दरम्यान, रिझर्व्ह बँकेने केलेल्या नव्या नियमांनुसार कर्जवसुलीसाठी कर्जदार किंवा जामिनदाराशी संपर्क साधण्याची वेळ निश्चित करण्यात आली आहे. वसुली एजंट किंवा बँकेचे कर्मचारी सकाळी आठ ते संध्याकाळी सात या वेळेतच कर्जदाराशी संपर्क करू शकतील. कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू, वैद्यकीय आणीबाणी किंवा अशा संवेदनशील परिस्थितीमध्ये कर्जदाराच्या घरी फोन किंवा भेट देणे टाळावे लागणार आहे. कर्जवसुली करताना शिवीगाळ, धमकी किंवा अपमानास्पद भाषेचा वापर करण्यासही मनाई करण्यात आली आहे. कर्जदार किंवा जामीनदाराचे व्हिडीओ, ऑडिओ रेकॉर्डिंग अथवा खासगी माहिती 'सोशल मीडिया'वर टाकून दबाव आणता येणार नाही. ग्राहकांच्या माहितीचा गैरवापर होऊ नये, यासाठी बँका आणि कर्ज देणाऱ्या संस्थांना प्रभावी नियंत्रण व्यवस्था उभी करावी लागणार आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांवर आणि रिकव्हरी एजन्सींवर दंडात्मक तरतुदी करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. रिझर्व्ह बँकेने बँकांना थकीत कर्जाच्या वसुलीसाठी स्वतंत्र आणि स्पष्ट धोरण तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. या धोरणात कर्जदाराने कर्जाची परतफेड न केल्यास कोणत्या टप्प्यावर कोणती कारवाई करायची, तारण ठेवलेल्या मालमत्तेचा ताबा कसा घ्यायचा, रिकव्हरी एजंट आणि कर्मचाऱ्यांनी कोणत्या आचारसंहितेचे पालन करायचे, याची स्पष्ट माहिती असावी. कर्जदाराचा मृत्यू झाल्यास थकीत कर्जाची वसुली कशी करायची, आर्थिक अडचणीत सापडलेल्या कर्जदारांशी कसे वागायचे आणि वसुलीची कठोर कारवाई करण्यापूर्वी कोणते पर्याय उपलब्ध करून द्यायचे, याचाही या धोरणात समावेश असणे आवश्यक आहे. म्हणजेच आर्थिक संकटात सापडलेल्या व्यक्तीला न धमकवता चर्चा, पुनर्रचना किंवा उपलब्ध तोडग्यांचा विचार करण्याची व्यवस्था करण्यावर भर देण्यात आला आहे. आत एक लक्षवेधी बातमी. 'इंडिया पॉलिसी फोरम २०२६'मध्ये सादर करण्यात आलेल्या एका अभ्यासानुसार भारताला प्रक्रिया केलेल्या अन्नाच्या निर्यातीत तब्बल ११० अब्ज डॉलरपर्यंतची संधी उपलब्ध होऊ शकते. भारतीय रुपयांमध्ये ही रक्कम दहा लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. भारताकडे जगातील लागवडीयोग्य जमिनीपैकी सुमारे १४ टक्के जमीन आहे. अनेक कृषी उत्पादनांच्या बाबतीत भारत जगातील आघाडीच्या उत्पादकांमध्ये आहे; मात्र जागतिक प्रक्रिया केलेल्या अन्नाच्या निर्यातीत भारताचा वाटा दोन टक्क्यांपेक्षाही कमी आहे. या आकडेवारीत भारताच्या कृषी क्षेत्रातील सर्वात मोठी विसंगती दिसते. उत्पादन मोठ्या प्रमाणात होते; मात्र त्या उत्पादनावर प्रक्रिया करून अधिक मूल्य निर्माण करण्यात आपण मागे आहोत. जगातील गव्हाच्या उत्पादनात भारताचा वाटा सुमारे १४ टक्के आहे; परंतु गव्हापासून तयार होणारे पीठ, पास्ता यांसारख्या प्रक्रिया केलेल्या उत्पादनांच्या जागतिक निर्यातीत भारताचा वाटा केवळ २.५ टक्के आहे. कोरड्या कडधान्यांच्या उत्पादनात भारताचा वाटा तब्बल २७.४ टक्के आहे; मात्र डबाबंद आणि गोठवलेल्या बीन्सच्या जागतिक निर्यातीमध्ये भारताचा वाटा अवघा ०.५ टक्के आहे. म्हणजे भारत कच्चा माल मोठ्या प्रमाणावर तयार करतो; पण त्याच कच्च्या मालातून जागतिक बाजारपेठेसाठी अधिक मूल्य असलेली उत्पादने तयार करण्याची क्षमता अद्याप पूर्णपणे वापरलेली नाही.

भारतासमोरील एक मोठे आव्हान म्हणजे ग्रामीण भागातील अतिरिक्त मनुष्यबळाला उत्पादक रोजगार उपलब्ध करून देणे. शेतीवर अवलंबून असलेल्या मोठ्या लोकसंख्येला केवळ शेतीमध्येच रोजगार देणे शक्य नाही. त्यामुळे कृषीआधारित उद्योग, अन्नप्रक्रिया, पॅकेजिंग, वाहतूक, कोल्ड स्टोरेज आणि निर्यात या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण करणे गरजेचे आहे. २०२१ ते २०२४ या काळात प्रक्रिया केलेल्या अन्नाची जागतिक निर्यात दरवर्षी सरासरी १.२ ट्रिलियन डॉलर इतकी होती. त्यातून चहा आणि कॉफी वगळल्यानंतरही बाजारपेठ प्रचंड राहते. वनस्पतीजन्य प्रक्रिया केलेल्या अन्नाची निर्यातच सुमारे ७०० अब्ज डॉलर होती. तुलना केली तर जागतिक कपड्यांच्या निर्यातीची बाजारपेठ सुमारे ४८९ अब्ज डॉलर होती. त्यामुळे फूड प्रोसेसिंग हे एखादे मर्यादित किंवा विशिष्ट क्षेत्र नसून जागतिक उत्पादन आणि निर्यातीतील एक मोठे औद्योगिक क्षेत्र आहे. फूड प्रोसेसिंग उद्योगात औपचारिक रोजगाराची क्षमताही मोठी आहे. भारतातील औपचारिक अन्नप्रक्रिया कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांचे वार्षिक उत्पन्न सुमारे १.४ लाख रुपये आहे. पूर्व भारतातील छोट्या शेतकरी कुटुंबांमधील मजुरांच्या सरासरी उत्पन्नाच्या तुलनेत हे सुमारे चारपट आहे. यावरून कृषीआधारित प्रक्रिया उद्योग ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नात किती मोठी भर घालू शकतो, याची कल्पना येते; मात्र भारताची अडचण उत्पादनक्षमतेत नाही, तर संपूर्ण मूल्यसाखळीत आहे. शेतकरीवर्ग आणि संकलन केंद्र, प्रक्रिया उद्योग, साठवणूक, वाहतूक, पॅकेजिंग आणि निर्यातदार यांच्यात पुरेसा समन्वय नसल्यामुळे मोठी क्षमता वाया जाते. शेती उत्पादन विखुरलेले असल्यामुळे प्रक्रिया उद्योगांना सातत्याने आणि एकसमान दर्जाचा कच्चा माल मिळणे कठीण जाते.

चर्चा आजची

क्षणाचा उद्रेक अन् आयुष्याचा कडेलोट!

राकेश लोहार

काही घटना बातमी म्हणून वाचून आपण पुढच्या क्षणी विसरून जातो. काही घटना मात्र मनाच्या एखाद्या कोपऱ्यात कायमची घर करून बसतात. छत्रपती संभाजीनगरमधील एका कुटुंबावर कोसळलेली शोकांतिका अशीच आहे. एका मुलाच्या भावनिक उद्रेकातून सुरू झालेली घटना अखेर तीन जीवांच्या अंतावर येऊन थांबली. एका मुलाने आयुष्य संपवण्याच्या टोकाच्या विचाराकडे पाऊल टाकले; त्याला वाचवण्यासाठी बाप धावला आणि त्यानंतर घडलेल्या दुर्दैवी घटनांनी आई-वडिलांचे स्वप्न, एका तरुणाचे भविष्य आणि एका कुटुंबाचा संसारच संपवून टाकला.

ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका म्हणून पाहून चालणार नाही. हा प्रसंग आपल्या घराघरात डोकावून पाहण्याची वेळ आणणारा आरसा आहे. प्रश्न एका मुलाचा नाही, एका आई-वडिलांचा नाही; प्रश्न आहे तो आपल्या मुलांच्या मनाचा. आपण त्यांच्याशी खरंच बोलतो का? त्यांचे म्हणणे आपण ऐकतो का? त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू पाहून आपण समाधानी होतो; पण त्या हसऱ्या चेहऱ्यामागे काही वेदना लपल्या आहेत का, हे कधी जाणून घेण्याचा प्रयत्न करतो का?

आजची पिढी तंत्रज्ञानाच्या बाबतीत प्रचंड पुढे गेली आहे. हातात जग आले आहे; माहिती एका क्षणात मिळते; संवादासाठी अनेक साधने आहेत. पण विचित्र विरोधाभास असा की, साधने वाढली आणि मन मोकळे करण्याची माणसे कमी झाली. घरात चार माणसे असतात; प्रत्येकाच्या हातात भ्रमणध्वनी असतो; पण एकमेकांच्या मनात काय सुरू आहे, हे कळायला वेळ नसतो.मुलांच्या गरजा पूर्ण करणे म्हणजे पालकत्व नाही. महागड्या वस्तू देणे, चांगले शिक्षण देणे, सुखसोयी उपलब्ध करून देणे ही जबाबदारीची एक बाजू आहे. पण, त्यापेक्षा मोठी जबाबदारी आहे मुलाला हे जाणवून देणे की, काहीही झाले तरी तू एकटा नाहीस. तुझ्या आयुष्यात कितीही अडचण आली तरी माझ्याशी बोल.

पालकांनी मुलांकडून अपेक्षा ठेवू नयेत, असे नाही. अपेक्षा असायलाच हव्यात. पण, त्या अपेक्षांचे ओझे मुलांच्या छातीवर ठेवून त्यांचा श्वासच कोंडला जाऊ नये. प्रत्येक मूल डॉक्टर, अभियंता, अधिकारी किंवा मोठ्या पदावर गेलेच पाहिजे असे नाही. मुलाचे यश केवळ गुणपत्रिकेत मोजता येत नाही. तो चांगला माणूस बनला, संकटात उभा राहायला शिकला, अपयश पचवले आणि पुन्हा प्रयत्न करण्याची हिंमत ठेवली, तर तेही मोठे यशच आहे.

मुलांनीही एक गोष्ट मनात कायमची कोरून ठेवायला हवी की, अपयश म्हणजे आयुष्याचा शेवट नाही. नकार म्हणजे तुमची किंमत कमी झालेली नाही. एखादी व्यक्ती दूर गेली म्हणून जग संपत नाही. परीक्षेत कमी गुण मिळाले म्हणून भविष्य संपत नाही. एखादे स्वप्न पूर्ण झाले नाही म्हणून नवी स्वप्ने पाहण्याचा अधिकार संपत नाही.

आयुष्याला पर्याय नसतो. परिस्थिती बदलू शकते; माणसे बदलू शकतात; अडचणी येतात आणि जातात; पण गेलेले आयुष्य परत मिळत नाही. म्हणून मनात वादळ उठले, राग आला, अपमान झाला, प्रेमात अपयश आले, परीक्षेचा ताण आला किंवा घरच्यांशी भांडण झालेल्या क्षणी कोणताही अंतिम निर्णय घेऊ नका. काही काळ थांबा. कोणाशी तरी बोला. आईशी बोला, वडिलांशी बोला, मित्राशी बोला, शिक्षकांशी बोला किंवा विश्वासातील कोणत्याही व्यक्तीशी बोला. मनातला भार शब्दांत बाहेर आला की त्याचे वजन कमी होऊ लागते.

पालकांनीही मुलांच्या प्रत्येक बदलाकडे लक्ष दिले पाहिजे. अचानक शांत होणे, सतत एकटे राहणे, चिडचिड वाढणे, आवडीच्या गोष्टींपासून दूर जाणे, झोप किंवा खाण्याच्या सवयींमध्ये मोठा बदल होणे या गोष्टी केवळ 'मुलांचे वय आहे' म्हणून दुर्लक्षित करू नयेत. चौकशी करताना चौकशी अधिकाऱ्यासारखे नाही, तर आई-वडिलांसारखे वागावे. 'काय झालं?' एवढेच विचारण्याऐवजी 'तू काहीतरी मनात ठेवतोयस का? मला सांग, मी तुझ्यासोबत आहे,' असे म्हणणे कधी कधी एखाद्या जीवाला धरून ठेवू शकते.

आपल्या घरातील संवादाची दारे बंद झाली, तर मुलं बाहेरच्या जगात आधार शोधतील. आणि त्या जगात प्रत्येकजण आपल्याला समजून घेईलच असे नाही. त्यामुळे घर हे केवळ राहण्याचे ठिकाण न राहता मुलांसाठी सुरक्षित भावनिक आश्रयस्थान झाले पाहिजे. या शोकांतिकेत एका कष्टाळू वडिलांचे आयुष्य गेले. आपल्या मुलाने मोठे व्हावे, त्याचे भविष्य उज्ज्वल व्हावे, अशी स्वप्ने पाहणाऱ्या त्या वडिलांच्या स्वप्नांनाही अंत मिळाला. वृद्ध आई-वडिलांचा आधार गेला. बहिणीच्या मनातला भाऊ हरपला. आणि, एका कुटुंबाच्या आयुष्यभराच्या आठवणींच्या जागी कायमचा सन्नाटा उरला. या वेदनेची भरपाई कोणताही पैसा करू शकत नाही. म्हणूनच एक प्रश्न विचार करण्यासारखा आहे. तो म्हणजे, आपण आपल्या मुलांना जगण्याची तयारी शिकवतोय का, की फक्त जिंकण्याची? त्यांना जिंकायला शिकवा; पण हरल्यावर पुन्हा उभे राहायलाही शिकवा. त्यांना स्वप्ने दाखवा; पण स्वप्न भंगल्यावर आयुष्य किती सुंदर आहे हेही समजवा. त्यांना स्पर्धा शिकवा; पण स्वतःशी प्रेम करायला विसरू देऊ नका. आणि, सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मुलांशी बोलत राहा. कारण, कधी कधी एका प्रेमळ संवादाची किंमत एका संपूर्ण आयुष्यापेक्षा मोठी असते. एक क्षणाचा राग कायमचा पश्चात्ताप बनू नये. एक अपयश संपूर्ण आयुष्यावर भारी पडू नये. आणि एका अंधाऱ्या क्षणी एखाद्या मुलाला स्वतःचे आयुष्य निरर्थक वाटू नये.

कारण आयुष्य परिपूर्ण नसले तरी अमूल्य आहे. आयुष्यात संकटे येतात; पण संकटांपेक्षा माणूस मोठा असतो. रात्र कितीही काळी असली तरी सकाळ येतेच. म्हणूनच मुलांना फक्त यशस्वी बनवू नका; त्यांना जगायला शिकवा. आणि मुलांनो, कितीही कठीण क्षण आला तरी स्वतःला एक संधी नक्की द्या, कारण तुमची कथा अजून संपलेली नसते.

लोकसंसद

कुंपणच जेव्हा शेत खाते!

पूर्वी सामान्यतः चोर, दरोडेखोर यांच्या भीतीने सोने नाणे, पैसा अडका घरातच दडवून ठेवला जायचा. त्यासाठी अडगळीची खोली किंवा धान्यांचे डबे यांचा उपयोग केला जायचा. नंतरच्या काळात बँकांची सोय झाली बँकेतील ठेव, पैसा अडका सोने नाणे सुरक्षित राहील अशा विश्वासाने सामान्य ग्राहक बँकेचा अधिकाधिक वापर करू लागले, परंतु अलिकडच्या काळात बँका बुडीत निघण्याचे प्रमाण वाढले आहे. मोठ्या विश्वासाने ठेवलेली कष्टाची कमाई जेव्हा नाहीशी होते तेव्हा आभाळच कोसळल्यासारखे होते. कांदिवलीच्या एका ज्येष्ठ नागरिकाने त्याच्या लॉकरमध्ये ठेवलेले सहाशे दहा ग्रॅम वजनाचे सोने गायब झालेले आढळले. यामध्ये बँकेच्या माजी व्यवस्थापकाचा हात असल्याचे उघड झाले. हल्ली 'पांढऱ्या पोशाखातील' (व्हाईट कॉलर) गुन्हेगारीचे प्रमाण खूपच वाढले आहे असे दिसून येते. निवृत्तीनंतर या गृहस्थांना ग्रॅच्युइटी, फंड इत्यादीद्वारे मोठी रक्कम मिळाली असणार तरीही अशी कुबुद्धी का व्हावी! नीतिमत्ता गहाण का टाकली जाते तर माणूस म्हणून जगण्यासाठी माणुसकी असावी लागते तीच नाहीशी झालेली दिसते. म्हणून शिक्षकच प्रश्नपत्रिका विकून पैसे कमावतात. वैद्यकीय व्यवसायात शिरलेल्या 'किडनी रॅकेट' अनैतिक 'गर्भपात' यासारख्या घटना, तर काहीवेळा तुरुंगाधिकारीच कैद्यांना सुखसोई पुरवतात. यासारख्या घटना म्हणजे कुंपणाने शेत खाल्ल्यासारखे आहे. हे बदलण्यासाठी भ्रष्टाचाराला मिळालेली प्रतिष्ठा कारणीभूत आहे असे वाटते. यामध्ये बदल होण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यायला हवे तरच समाजातील अपप्रवृत्ती कमी होतील.

-श्रीमती संध्या काटदरे, माणगाव

दिनविशेष

अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी

मराठी साहित्यविश्वात आपल्या असामान्य प्रतिभेने अढळ स्थान निर्माण करणाऱ्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची आज जयंती. कोणतेही औपचारिक शिक्षण न घेतलेल्या, आयुष्यभर कष्ट आणि संघर्षाला सामोरे गेलेल्या या निरक्षर स्त्रीने आपल्या अनुभवातून, निरीक्षणातून आणि उपजत काव्यप्रतिभेतून असे साहित्य निर्माण केले की, ते महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांच्या मनावर आजही राज्य करीत आहे.

बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगावजवळील असोदे या गावी झाला. त्या काळातील सामाजिक परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. पुढे तरुण वयातच त्यांच्यावर वैधव्याचे दुःख कोसळले. एकत्र कुटुंब विभक्त झाल्यानंतर आणि पतीच्या निधनानंतर त्यांचे जीवन अत्यंत खडतर झाले. मात्र या प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपल्या मुलांवर उत्तम संस्कार केले.

बहिणाबाई कधीही शाळेत गेल्या नाहीत. त्यांना लिहिता-वाचता येत नव्हते. परंतु कविता ही त्यांच्या रक्तातच होती. शेतात काम करताना, घरातील कामे करताना, जात्यावर दळताना त्यांच्या मनात काव्य उमटत असे. त्या उत्स्फूर्तपणे कविता आणि ओव्या म्हणत. त्यांच्या असंख्य कविता त्यांनी स्वतः लिहिल्या नाहीत, त्यामुळे त्यातील अनेक रचना काळाच्या ओघात हरवून गेल्या. बहिणाबाईंच्या निधनानंतर सोपानदेव यांनी त्यांच्या कविता आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांना दाखवल्या. या कविता वाचल्यानंतर अत्रे यांनी त्यांच्या प्रतिभेचे मोल ओळखले आणि त्या महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे हा अन्याय ठरेल, अशी भावना व्यक्त केली. १९५२ मध्ये आचार्य अत्रे यांच्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कवितांचा संग्रह प्रकाशित झाला आणि महाराष्ट्राला या अद्भुत कवयित्रीची ओळख झाली. बहिणाबाईंच्या कविता त्यांच्या मातृभाषेतील वऱ्हाडी-अहिराणी-खानदेशी बोलीच्या सहज, ओघवत्या आणि जिवंत भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय त्यांच्या आजूबाजूचे जग होतेसंसार, माहेर-सासर, शेती, कष्टकरी जीवन, निसर्ग, पशुपक्षी, सण-उत्सव, आई-वडील, भाऊ-बहीण आणि मानवी नातेसंबंध. त्यामुळे त्यांच्या कविता वाचताना त्या केवळ कविता वाटत नाहीत; त्या आपल्या जगण्याचेच प्रतिबिंब वाटतात. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख-दुःखांकडे समतोलपणे पाहण्याची दृष्टी आणि अनुभवातून आलेले जीवनतत्त्वज्ञान ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये होती. 'अरे संसार संसार', 'खोप्यामधी खोपा', 'मन वढाय वढाय', 'धरित्रीले दंडवत' यांसारख्या त्यांच्या कविता महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांनी वाचल्या, ऐकल्या आणि मनात जपल्या आहेत. आज त्यांच्या अनेक कविता शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी त्यांच्या कवितांचे अध्ययन केले आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला 'कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ' हे नाव देण्यात आले, ही त्यांच्या साहित्यिक योगदानाला मिळालेली मोठी आदरांजली आहे. ज्या स्त्रीला औपचारिक शिक्षणाची संधी मिळाली नाही, तिने आपल्या जीवनानुभवातून आणि उपजत प्रतिभेतून मराठी साहित्याला अमूल्य ठेवा दिला. परिस्थितीने त्यांना अडवले, पण त्यांच्या प्रतिभेला कधीच रोखू शकले नाही. म्हणूनच बहिणाबाई चौधरी या केवळ एक कवयित्री नाहीत, तर महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा आणि मातीतल्या संस्कृतीचा जिवंत आवाज आहेत. ३ डिसेंबर १९५१ रोजी त्यांचे निधन झाले; मात्र त्यांच्या कविता आजही जिवंत आहेत. काळाच्या ओघात अनेक साहित्यिकांची नावे विस्मृतीत जातात; परंतु बहिणाबाईंच्या कविता मात्र महाराष्ट्राच्या मनात कायमच्या कोरल्या गेल्या आहेत. त्यांचे साहित्य म्हणजे अनुभवातून उमटलेले बावनकशी सोनेच!

या महान कवयित्रीच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन! त्यांच्या साहित्याचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

- श्याम ठाणेदार, पुणे

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ ऑगस्ट

१) श्री.लक्ष्मण तुकाराम सारंग बंदर विभाग, कोळीवाड-अलिबाग, दि.२४-८-१९५०

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

ब्लू फ्लॅगसाठी किनारपट्टी सज्ज

आंतरराष्ट्रीय समिती करणार पाहणी ; पाच समुद्रकिनाऱ्यांची निवड

। रायगड । प्रतिनिधी ।

परदेशातील समुद्रकिनाऱ्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातील किनारे स्वच्छ, सुरक्षित आणि पर्यटकांसाठी अत्याधुनिक सुविधांनी युक्त करण्यासाठी राज्याच्या पर्यटन विभागाने एक नवीन प्रकल्प हाती घेतला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'ब्लू फ्लॅग' मानांकन मिळविण्यासाठी राज्यातील लाडघर, गुहागर, नागाव, श्रीवर्धन आणि डहाणू या पाच समुद्रकिनाऱ्यांची प्रायोगिक तत्त्वावर निवड करण्यात आली आहे. या मानांकनासाठी आवश्यक असलेले ३३ निकष पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून तयारी सुरू आहे. काही दिवसांत डेन्मार्कस्थित संबंधित आंतरराष्ट्रीय समितीचे पथक या पाचही समुद्रकिनाऱ्यांची पुन्हा पाहणी करणार आहे.

ब्लू फ्लॅग मानांकन केवळ समुद्रकिनाऱ्याच्या सौंदर्यावर किंवा पर्यटक सुविधांवर दिले जात नाही. पर्यावरणीय शिक्षण, समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता, पर्यावरणीय व्यवस्थापन तसेच पर्यटकांची सुरक्षा आणि सेवा अशा चार प्रमुख क्षेत्रांतील एकूण ३३ निकषांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे निवडलेल्या पाचही किनाऱ्यांवर आवश्यक सुविधा उभारण्याबरोबरच पर्यावरणीय निकषांची पूर्तता करण्याचे मोठे आव्हान पर्यटन विभागासमोर आहे. कोकण किनारपट्टीवरील पाच समुद्र किनारे ह्या मानांकन साठी पात्र ठरले आहेत. देशातील तेरा किनाऱ्याची ह्या पथकाने पाहणी केली होती. राज्यातील पाच किनाऱ्यांचे या पाहणीत निवड झाली आहे.

समुद्रातील पाण्याची गुणवत्ता हा या मानांकनातील अत्यंत महत्त्वाचा निकष आहे. पाण्याचे नमुने निर्धारित पद्धतीने आणि ठरावीक वारंवारतेने तपासणे, पाण्याच्या गुणवत्तेचे विश्लेषण निर्धारित मानकांनुसार करणे आवश्यक आहे. समुद्रकिनाऱ्यावर परिणाम करणारा कोणत्याही प्रकारचा औद्योगिक सांडपाणी, मलनिस्सारण किंवा इतर सांडपाण्याचा प्रवाह नसणे हीदेखील महत्त्वाची अट आहे. समुद्रकिनारा व्यवस्थापनात स्थानिकांचा सहभाग असावा, यासाठी समुद्रकिनारा व्यवस्थापन समिती स्थापन करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर किनारा कायम स्वच्छ ठेवणे, पुरेशा कचरापेट्या उपलब्ध करणे, ओला-सुका आणि पुनर्वापरयोग्य कचरा वेगळा करण्याची व्यवस्था करणे, तसेच पुरेशी आणि स्वच्छ स्वच्छतागृहे उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता आणि सांडपाण्याची योग्य विल्हेवाट यालाही निकषांमध्ये महत्त्व देण्यात आले आहे.

समुद्रकिनाऱ्यावर नैसर्गिकरीत्या वाहून आलेले शेवाळ किंवा नैसर्गिक जैविक अवशेष सरसकट हटविण्याऐवजी पर्यावरणीय दृष्टिकोनातून त्यांचे व्यवस्थापन करणे अपेक्षित आहे. अनधिकृत तंबू, वाहनांची ये-जा आणि कचरा टाकण्यास प्रतिबंध असणे, तसेच पाळीव प्राण्यांच्या प्रवेशावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. सुरक्षेसाठी प्रथमोपचार साधने, आपत्कालीन परिस्थितीसाठी आराखडा आणि विविध पर्यटन उपक्रमांमुळे होणारे अपघात किंवा संघर्ष टाळण्यासाठी योग्य व्यवस्थापन आवश्यक आहे. पर्यटकांसाठी आचारसंहिता आणि समुद्रकिनाऱ्यावरील सुविधांचा नकाशा प्रदर्शित करणेही आवश्यक आहे. या संदर्भात पर्यटन विभागाच्या डेन्मार्कस्थित संबंधित समितीसोबत आतापर्यंत तीन बैठका झाल्या आहेत.

अरविंद रणदिवे यांचे निधन

। कोलाड । वार्ताहर ।

येथील निवृत्त प्राथमिक शिक्षक अरविंद कृष्णाजी रणदिवे ऊर्फ बापू रणदिवे (वय ७७) यांचे शुक्रवारी (दि. १४) निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रणदिवे हे विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून परिचित होते. त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले होते. समर्थ रामदास स्वामी यांचे ते अनुग्रहित होते. समर्थ वाङ्मय आणि अध्यात्माचा त्यांचा दांडगा व्यासंग होता. अनेकांसाठी ते मार्गदर्शक होते. हसतमुख स्वभाव आणि सर्वांशी सहजतेने संवाद साधण्याच्या गुणामुळे ते समाजात लोकप्रिय होते. त्यांच्या पश्चात रणदिवे-नाईककर आप्तेष्ट व मित्र परिवार आहे. त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

त्यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि. २३) सकाळी ८.३० वाजता वरदायिनी सोसायटी, कोलाड हायस्कूलसमोर, कोलाड येथे होणार आहे. तसेच उत्तरकार्य बुधवारी (दि. २६) सकाळी १० वाजता त्याच ठिकाणी होणार आहेत.

फूटपाथवरील अतिक्रमणामुळे विद्यार्थ्यांना धोकादायक मार्गाचा आधार

महापालिका प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

। पनवेल । प्रतिनिधी ।

जय अंबे माता मंदिरासमोरील गटारीवरील झाकण गायब झाल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या मार्गावरून दररोज विद्यार्थी ये-जा करत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

या गटारीतून महावितरणच्या विद्युत केबल टाकण्यात आल्याचे दिसून येत आहे. गटारीचे झाकण नसल्याने या ठिकाणी धोकादायक परिस्थिती निर्माण झाली असून, पावसाळ्यात गटारीत पाणी साचल्यास धोका आणखी वाढण्याची शक्यता आहे.

या परिसरातून डीएव्ही स्कूल आणि शांती निकेतन स्कूलचे विद्यार्थी मोठ्या संख्येने ये-जा करतात. मात्र, फूटपाथवर सध्या बंद असलेल्या टपऱ्यांनी अतिक्रमण केल्याने विद्यार्थ्यांना पादचारी मार्गाचा वापर करता येत नाही. परिणामी त्यांना महावितरणच्या धोकादायक डीपीजवळून मार्ग काढावा लागत आहे.

गटारीचे झाकण गायब असल्याची तसेच फूटपाथवरील अतिक्रमणाची माहिती महापालिका प्रशासनाला देण्यात आली आहे. मात्र, अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महापालिकेने तातडीने गटारीवर नवीन झाकण बसवावे, फूटपाथवरील अतिक्रमणे हटवावीत आणि महावितरणच्या डीपी परिसराची सुरक्षा तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

आरोग्य तपासणी

कोलाड : पनवेल रिक्षा विद्यार्थी वाहक संस्था आणि जिल्हा एड्स नियंत्रण विभाग, सिव्हिल हॉस्पिटल रायगड, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. तब्बल १५० वाहनचालकांनी आरोग्य तपासणी करून घेतली.

विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धेत राज्यस्तरावर रायगडचा झेंडा

। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभाग, राज्य मराठी विकास संस्था, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ङ्गअभिजात मराठी, अभिमान मराठीचाफ या उपक्रमांतर्गत झालेल्या विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील पाली येथील जी. बी. वडेर हायस्कूल व व. ग. ओसवाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर दैदिप्यमान यश संपादन केले आहे. सारंग बल्लाळ ठाकूर याने राज्यात चौथा तर वैष्णव सुशील थळे याने पाचवा क्रमांक पटकावत रायगडच्या शैक्षणिक क्षेत्राची राज्यस्तरावर दखल मिळवून दिली.

राज्यस्तरीय स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा कौतुक व पुरस्कार सोहळा ठाणे येथील राम गणेश गडकरी रंगायतन येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्यात राज्यभरातून विविध स्तरांवर यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा

■ सारंग ठाकूर, वैष्णव थळे यांचे राज्यस्तरावर घवघवीत यश

गौरव करण्यात आला.

सारंग ठाकूर आणि वैष्णव थळे यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते त्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र तसेच रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर मिळविलेल्या या यशामुळे पालीसह संपूर्ण सुधागड तालुका आणि रायगड जिल्ह्यात कौतुकाचा सूर उमटत आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यांचा मोठा वाटा आहे. शाळेचे प्राचार्य भाऊसाहेब घोडके, उपप्राचार्य आदिनाथ पोटे, मार्गदर्शक शिक्षक विक्रम काटकर व सुधीर शिंदे तसेच विद्यार्थ्यांचे पालक या सोहळ्यास उपस्थित होते.

वाघोशी रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात विद्यार्थ्यांचा आक्रोश

बहुजन विद्यार्थी संघटनेच्या नेतृत्वाखाली रस्त्यावर उतरून निदर्शने

। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील खुरावले फाटा ते वाघोशी या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून, यातून मार्ग काढताना शालेय विद्यार्थी, पालक आणि सामान्य नागरिकांना दररोज मरणयातना सहन कराव्या लागत आहेत. या गंभीर समस्येकडे डोळेझाक करणाऱ्या प्रशासनाला जागे करण्यासाठी वाघोशी येथील माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी थेट रस्त्यावर उतरून आपला तीव्र संताप व्यक्त केला आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून या मार्गाची प्रचंड दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर सर्वत्र पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शाळेत जाणाऱ्या चिमुकल्यांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याने विद्यार्थी त्रस्त आहेत, तर पालकवर्गातही भीती आणि नाराजीचे वातावरण आहे. केवळ आश्वासने न देता विद्यार्थ्यांच्या जिवाचा आणि सुरक्षिततेचा गांभीर्याने विचार करून खुरावले फाटा ते वाघोशी या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी सक्त मागणी यावेळी अमित गायकवाड आणि विद्यार्थ्यांनी केली. प्रशासनाने या आक्रोशाची त्वरित दखल घेऊन रस्ता दुरुस्तीचे काम मार्गी न लावल्यास आगामी काळात अधिक तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही आंदोलकांच्या वतीने संबंधित प्रशासनाला देण्यात आला आहे.

ढोल-ताशांच्या गजरात बाप्पाचे आगमन!

। खांदा कॉलनी । वार्ताहर ।

श्री गणेशोत्सवाची चाहूल लागताच मोठ्या गणेश मंडळांकडून लाडक्या बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. कोपरखैरणे सेक्टर-२ येथील मोरया सांस्कृतिक कला क्रीडा मंडळाच्या इच्छापूर्ती संरक्षणाधीश पर्यावरणपूरक श्री गणेशमूर्तीचे ढोल-ताशांच्या गजरात जल्लोषात आगमन करण्यात आले.

योग गुरुकुल अकॅडमीचा तृतीय वर्धापनदिन सोहळा साजरा

। नागोठणे । प्रतिनिधी ।

योगाच्या माध्यमातून निरोगी, आनंदी आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या योग गुरुकुल अकॅडमी नागोठणे या अकॅडमीचा तृतीय वर्धापनदिन सोहळा नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

गेल्या तीन वर्षांपासून योग, प्राणायाम, ध्यानधारणा आणि विविध योगासनांच्या माध्यमातून महिला वर्गामध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य योग गुरुकुल अकॅडमीच्या माध्यमातून सुरू आहे. अकॅडमीच्या या उपक्रमाला दिवसेंदिवस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अनेक महिला नियमितपणे योगाभ्यासाचा लाभ घेत आहेत.या वर्धापनदिन सोहळ्यात योगाभ्यासावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या महिला व योगसाधकांनी आपल्या उत्कृष्ट योगकौशल्याचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू व गौरवपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

योगगुरू यामिनी माळी-दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली अकॅडमीमध्ये योगाचे शास्त्रशुद्ध व सर्वोत्तम प्रशिक्षण दिले जात असून, योगाच्या माध्यमातून महिलांचे आरोग्य, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकास साधण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. महिला सक्षमीकरण आणि आरोग्यजागृतीच्या क्षेत्रात अकॅडमीचे कार्य विशेष उल्लेखनीय ठरत आहे. वर्धापनदिनानिमित्त नागोठण्यातील मायालक्ष्मी हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुनील पाटील, बॉडीसेफ एक्वापमेंट मालक सुभाष माळी, आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते शिक्षक नंदकुमार मरावडे, शिक्षिका शिल्पा मरवडे, बॉडीसेफ फिटनेस जीमचे मालक मंगेश सानप, सुशील दिघे, हेमंत सानप, नागमणी मॅचेट्टी, नागोठणे ग्रा.पंचायत सदस्या पूनम काळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

७४३ तक्रारींचे तातडीने निराकरण | **पनवेल शहर विभागातील १६ शिबिरांमध्ये ग्राहकांच्या समस्या निकाली**

महावितरणच्या ग्राहक समाधान शिबिरांना प्रतिसाद

। पनवेल । वार्ताहर ।

वीज ग्राहकांच्या समस्या आणि तक्रारींचे स्थानिक पातळीवर तातडीने निराकरण करण्यासाठी महावितरणच्या पनवेल शहर विभागात आयोजित करण्यात आलेल्या १६ ग्राहक समाधान शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरांमध्ये ७४३ ग्राहकांनी सहभाग घेतला असून, ग्राहकांनी मांडलेल्या सर्व ७४३ तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यात आले.

मुख्य अभियंता, भांडुप परिमंडल संजय पाटील यांच्या

■ तळोज्यात सर्वाधिक ३६० तक्रारींचे निराकरण

निर्देशानुसार आणि अधीक्षक अभियंता, वाशी मंडल दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही शिबिरे आयोजित करण्यात आली होती. पनवेल शहर विभागातील खारघर, पनवेल, तळोजा आणि उरण या चार उपविभागांत एकूण १६ शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

खारघर उपविभागात दोन, पनवेल उपविभागात तीन, तळोजा उपविभागात आठ, तर उरण उपविभागात तीन शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमध्ये खारघरमधील १५६, पनवेलमधील १५८, तळोजामधील ३६० आणि उरणमधील ६९, अशा एकूण ७४३ ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात आले. तळोजा उपविभागातील आठ शिबिरांना सर्वाधिक प्रतिसाद मिळाला. या ठिकाणी ३६० ग्राहकांनी आपल्या तक्रारी मांडल्या आणि सर्व तक्रारींचे जागेवरच निराकरण करण्यात आले. त्यापाठोपाठ पनवेलमध्ये १५८, खारघरमध्ये १५६ आणि उरणमध्ये ६९ तक्रारी निकाली काढण्यात आल्या. महावितरणकडून ग्राहकांना तत्पर, पारदर्शक आणि उत्तम सेवा देणे हे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी सांगितले. ग्राहक समाधान शिबिरांच्या माध्यमातून ग्राहकांना आपल्या समस्या थेट मांडण्याबरोबरच विविध योजना आणि सुविधांची माहिती घेण्याची संधी मिळत असल्याने वीज ग्राहकांनी अशा शिबिरांचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या कामाची पाहणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या सुरू असलेल्या बांधकामाची आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) कर्जत तालुक्याच्या वतीने पाहणी करण्यात आली.

कर्जत शहरात नगरपरिषद हद्दीत शासकीय विश्रामगृह समोरील जागेत भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन उभे राहत आहे.

या भवनाचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून या कामाची पाहणी आरपीआय आठवले गटाच्या कार्यकर्त्यांनी केली. आरपीआयचे पदाधिकारी राहुल डाळिंबकर, मनोज गायकवाड, किशोर गायकवाड, सुरेखा कांबळे, मीना काकडे, अरविंद मोरे, वैशाली भोसले, विजय जाधव, संतोष जाधव, राहुल जाधव उपस्थित होते. यावेळी आरपीआयच्या पदाधिकाऱ्यांनी भवनाच्या बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाच्या प्रगतीची माहिती घेतली.

भवनाचे काम दर्जेदार आणि नियोजना नुसार पूर्ण व्हावे, तसेच समाजाच्या उपयोगासाठी हे भवन लवकरात लवकर उपलब्ध व्हावे, याबाबत काम करणारे ठेकेदार, आर्किटेक यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली.

निवडक

शिष्यवृत्ती परीक्षेत जय किसान विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांचे सुयश

खरोशी : एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत पेण एज्युकेशन सोसायटीच्या जय किसान विद्यामंदिर वडखळ ह्या प्रशालेतील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त करून शाळेचे नाव उंचावले आहे. या विद्यालयात १६ विद्यार्थ्यांपैकी ८ विद्यार्थी पात्र झाले असून चांगल्या गुणांनी सुयश प्राप्त केले आहे.या विद्यार्थ्यांमध्ये श्रेयस धनाजी पाटील (२०६) सर्वेश भालचंद्र म्हात्रे (२०६) मृणाली दिलिप पाटील (२००) ज्ञानव शशी राज(१९६) रुद्र भरत म्हात्रे(१९६) पूर्वेश भोरेश्वर म्हात्रे(१९६)सिमरन प्रशांत पाटील (१९०) आणि कृपाली प्रकाश म्हात्रे (१७०) या विद्यार्थ्यांनी सुयश मिळून सर्व विद्यार्थी तालुका स्तरावर गुणवत्ता यादीत आलेले आहेत. तसेच ज्ञानव शशी राज याने२०२६ मध्ये झालेल्या भारत टॅलेंट सर्च परीक्षा यामध्ये ११६ गुण मिळवून राज्य गुणवत्ता यादीत १२२ वा क्रमांक मिळवून यश संपादन केले आहे व आपल्य प्रशालेचे नाव मोठे केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता घरत, मार्गदर्शक शिक्षक गितांजली पाटील, स्मिता अंजर्लेकर, सायली घोसाळकर याबरोबर पालक शिक्षक व विद्यार्थ्यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

माणगाव एसटी बस स्थानकावर हिरकणी कक्षाचे उद्घाटन

माणगाव : राज्य परिवहन महामंडळाच्या माणगाव बस स्थानक येथे महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या विशेष सहकार्यातून महिलांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या हिरकणी कक्षाचे उद्घाटन माणगाव पंचायत समितीच्या माजी सभापती तथा विद्यमान पंचायत समिती सदस्या संगीता बक्कम व राष्ट्रवादी काँग्रेस सोशल मीडिया प्रमुख किशोरी हिरवे यांच्याहस्ते फित कापून उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते चेतन गवाणकर,माणगाव आगाराचे सहायक वाहतूक निरीक्षक तुषार हाटे, वाहतूक नियंत्रक रविंद्र वाढवळ, दीपक गोरेगावकर, लक्ष्मण पांचाळ, प्रवीण मोरे, रोशनी तेलंगे, संगीता सूर्यवंशी, गीता डोंगरकर, सायली जाधव, योगेश टेकाळे, युवराज गार्लांदे, सागर कोळवणकर, चंद्रकांत मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते.

नांदगाव विद्यालयात नशामुक्ती जनजागृती अभियान

पाली/गोमाशी : महाराष्ट्र शासनाच्या व्यसनमुक्ती व नशामुक्त अभियान अंतर्गत संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव येथे जनजागृती व प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्यसनमुक्तता व नशामुक्त अभियान, डायल ११२ तात्काळ पोलीस मदत, सायबर सुरक्षा व महिला सुरक्षा, नशामुक्त विद्यालय अंतर्गत तीन वर्षातील प्रभावी अंमलबजावणी या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी पाली पोलीस ठाणे येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षेसाठी हेल्पलाईन नंबर, डायल ११२ चा वापर आणि सायबर फसवणुकीपासून कसे सावध राहावे याबाबत सविस्तर माहिती दिली.तसेच पोलीस हवालदार संदीप घासे यांनी व्यसनाचे दुष्परिणाम, ताण-तणावाचे व्यवस्थापन आणि नशेपासून दूर राहण्याचे महत्त्व पटवून दिले.तर प्रतीक्षा गायकवाड यांनी विद्यार्थिनींना महिला सुरक्षा, महिला सक्षमीकरण, गुड टच-बॅड टच आणि आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. ज्योती भोईर यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिक संघातर्फे विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप

नागोठणे : कै. श्रद्धा हरी वैद्य यांच्या स्मरणार्थ त्यांचे पती हरी वैद्य यांच्याकडून आणि वर्षा पाटणकर यांच्याकडून उपलब्ध झालेल्या शालेपयोगी वस्तू, छत्री व खाऊचे वाटप नागोठण्यातील राजिप कचेरी शाळा, राजिप कन्याशाळा व राजिप प्राथमिक शाळा जोगेश्वरी नगर या तीन शाळांतील सुमारे ७२ विद्यार्थ्यांना करण्यात आले. जोगेश्वरी नगर शाळेसाठी शुद्ध पाण्याचे फिल्टर यावेळी देण्यात आले. जोगेश्वरी नगर शाळेतील १ ली ते ४ थी पर्यंतच्या वर्गातील पहिल्या दोन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शिंदे गुरुजी यांच्या स्मरणार्थ उल्हास शिंदे यांच्याकडून रोख बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव उल्हास शिंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. या कार्यक्रमाला नागोठणे ग्रामपंचायतीचे उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, डॉ. मिलिंद धात्रक, सुप्रिया काकडे, पूनम इप्ते, भाविका गिजे, अमृता महाडिक, मुकुंद मोदगी, दिलीप शहासने, उल्हास शिंदे, दत्ता कडव, सुभाष भोय, सोनू जोशी, सुनील मोंढे, मुख्याध्यापिका समा शेळके, मुख्याध्यापिका विजया धनवडे, शिक्षिका कृती पडवळ, जोगेश्वरी नगर शाळेच्या मुख्याध्यापिका कल्याणी चौवरे, सुगंधा राजेश पिंपळे आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नेरळ-पेशवाई रस्ता खड्ड्यात

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पेशवाई रस्त्याची काँक्रीटीकरण करण्याचे काम केले जात आहे. या रस्त्यावरील आंबिवली जवळील रस्त्याचे काम बाकी आहे.त्या भागातील रस्त्याचे काँक्रीटीकरण झाले नसल्याने रस्त्यावर पडलेले खड्डे यामुळे वाहनचालक यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान त्या भागात साधारण २०० मीटर लांबीचा रस्ता खड्डेमय असल्याने त्या ठिकाणी खड्ड्यांची रांगोळी घातलेली दिसते तर रस्त्याच्या बाजूला साइडपट्टी नसल्याने वाहने रस्त्याखाली जात आहेत.

माणगाव फाटा ते आंबिवली फाटक आणि पुढे बोरले या भागातील पेशवाई

रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाचे एमएसआयडीसी या विभागाकडून रस्त्याचे काम सुरू आहे. या रस्त्यावरील कल्याण कर्जत राज्यमार्गाच्या माणगाव फाटा पासून रेल्वे फाटक आणि पुढे भास्कर व्हॅली प्रवेशद्वार असा रस्ता काँक्रीटीकरण झाले आहे.तर त्या भागातील जिते येथील वकिलांचे घर पासून पुढे बोरले गावापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण केले आहे. कर्जत कल्याण येथून माणगाव फाटा पासून सुरू होणारा रस्ता नेरळ भिमाशंकर रस्ता याला बोरले येथे जोडला जातो. हा रस्ता नेरळ गावाला वळसा घालून थेट बाहेर पडणारा रस्ता असल्याने वाहतुकीसाठी जवळचा मार्ग बनला आहे.या रस्त्याचे ९० टक्के काम अनेक वर्षांनी झाले असल्याने या रस्त्याचा वापर वाढला आहे. मात्र या रस्त्यावर ज्या ठिकाणी अपूर्ण काम ठेवण्यात आले आहे. साधारण २०० मीटर लांबीचा रस्ता अजून काँक्रीटीकरण केला गेला नाही. त्या ठिकाणी रस्त्यावरील डांबर काढून बाजूला टाकण्यात आली आहे.त्याचा परिणाम रस्त्यावरील रखडलेले काँक्रीटीकरण यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहेत. तर रस्त्यावरील काँक्रीटीकरण बरोबर आजुबाजूची साइड पट्टी देखील अर्धवट ठेवण्यात आली आहे. त्यामुळे रस्त्यावरील खड्डे यांची संख्या अगणित आहे. त्या खड्ड्यांमुळे रस्त्यावर रांगोळी घातली असल्याचे दिसून येत आहे.या खड्ड्यातून वाट करताना मागील दोन महिन्यात अनेक वाहने रस्त्याच्या कडेने गाडी नेत असताना रस्त्याखाली देखील गेलेली आहेत.त्यामुळे ते अर्धवट रस्ता वाहनचालक यांच्यासाठी धोकादायक आणि परीक्षा पाहणारा ठरत आहे. बांधकाम विभागाकडून वाहनचालक यांची गैरसोय टाळण्यासाठी तत्काळ रस्त्याचे काम पूर्ण करावे आणि वाहनचालक यांना दिलासा द्यावा अशी मागणी वाहनचालक करीत आहेत.

- **वाहन चालविणे बनले जिकिरीचे**
- **काम पूर्ण करण्याची मागणी**

विद्युत वाहिन्या धोकादायक

पाली : आनंद धामच्या शेजारी रस्त्यालगत असलेल्या विद्युत वाहिन्या धोकादायक स्थितीत लोंबकळत असल्याचे चित्र समोर आले आहे. या वाहिन्या रस्त्याच्या दिशेने खाली आल्याने परिसरातून ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या मार्गावर नागरिकांसह विद्यार्थी यांची सतत ये-जा सुरू असते. त्यातच विद्युत वाहिन्या कमी उंचीवर असल्याने मोठे वाहन या मार्गावरून गेल्यास वाहिन्यांना धक्का लागून गंभीर अपघात होण्याची शक्यता सुधागड तालुक्यात यापूर्वी करचुंडे परिसरातही विद्युत वाहिन्यांमुळे दुर्घटना घडून नागरिकांना जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत.

निवडक

मनोवृत्ती शुद्ध ठेवा : किशोर काळोखे

खांब : विद्यार्थ्यांनी आपल्या विचारांमध्ये सकारात्मकता, वाणीमध्ये गोडवा आणि मनोवृत्तीमध्ये स्थैर्य ठेवले, सातत्याने चांगला अभ्यास व मेहनत केली तर यश हमखास मिळते, असे प्रेरणादायी मार्गदर्शन तज्ञ मार्गदर्शक किशोर काळोखे यांनी विद्यार्थ्यांना केले. रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे सुदर्शन केमिकल्स कंपनीच्या सीएसआर फंड यांच्या माध्यमातून शैक्षणिक मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. तेव्हा ते बोलत होते. केवळ अभ्यास करणे पुरेसे नसून अभ्यासाचा दर्जा आणि कामाचा दर्जा महत्त्वाचा आहे, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तेला प्राधान्य देण्याचा सल्ला दिला.तर जपानी माणूस काटक, शिस्तप्रिय, हुशार, मेहनती आणि प्रतिकूल परिस्थितीतही खंबीरपणे उभा राहणारा असल्याचे सांगून, जपानच्या प्रगतीमागे तेथील नागरिकांची मेहनत, शिस्त, गुणवत्तेची कास आणि राष्ट्रहिताची भावना महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. किशोर काळोखे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विचार सकारात्मक, वाणी मधुर, अभ्यास गुणवत्तापूर्ण आणि मनोवृत्ती स्थिर असेल, तर यशाची वाट निश्चितच सुकर होते, हा संदेश या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना मिळाला.

गरुडपाडा शाळेत स्वच्छतागृह निर्मिती

नेरळ : कर्जत तालुक्यात आदिवासी आणि शैक्षणिक विभागात कार्य करणाऱ्या श्री साई ट्रस्ट आणि सील फाउंडेशन फाउंडेशन यांच्याकडून सहकार्य केले जात आहे. सील फाउंडेशनचे माध्यमातून आणि श्री साई ट्रस्ट यांच्या माध्यम ातून कळंब जवळील गरुडपाडा गावातील जिल्हा परिषद शाळेसाठी स्वच्छता गृह बांधून देण्यात आले आहे. सिल फाउंडेशन मुंबई यांच्या सौजन्याने व श्री साई ट्रस्ट नवी मुंबई यांच्या सहकार्याने रायगड जिल्हा परिषद शाळा गरुडपाडा येथील विद्यार्थ्यांसाठी सुलभ स्वच्छतागृह लोकार्पण करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांसाठी आत्ता आवश्यक असणारा स्वच्छतागृहाची मागणी गरुडपाडा शाळेचे मुख्याध्यापक गायकवाड यांनी केली होती. सदरची मागणी दिलिप घुले यांनी श्री साई ट्रस्ट नवी मुंबई यांचे कडे पाठपुरावा करून पूर्ण केली. गरुडपाडा येथील जिल्हा परिषद शाळेत बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृह लोकार्पण सोहळ्यासाठी श्री. साई ट्रस्टचे अध्यक्ष गणेश अय्यरतसेच लक्ष्मी अय्यर संचालिका. राधिका घुले यांचे हस्ते झाले. त्यावेळी स्थानिक ग्रामस्थ आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यावेळी गरुडपाडा गावातील ज्ञानेश्वर बदे, रुपेश खुणे, रश्मिका आगिवले, समिती अध्यक्ष मोरे तसेच शाळेतील शिक्षक शिकणे, जोशी, आणि विद्यार्थी उपस्थित होते.

विजेचा खांब अपघाताला निमंत्रण

पाली : सुधागड तालुक्यातील समतानगर ढोकशेत गावात विजेचा खांब अत्यंत धोकादायक स्थितीत उभा असून, यामुळे परिसरात एखादी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली

आहे. वारंवार सूचना देऊनही महावितरण या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र घबराट आणि संतापाचे वातावरण आहे. सम तानगरमधील हा विजेचा खांब तळाशी अत्यंत जीर्ण झाला असून तो कोणत्याही क्षणी कोसळू शकतो. या खांबावरून गेलेल्या उच्च दाबाच्या वीजवाहिन्यांमुळे लहान मुले, नागरिक आणि जनावरांच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यात किंवा सोसाट्याचा वारा आल्यास मोठा अपघात घडण्याची टांगती तलवार नागरिकांवर आहे.महावितरणच्या या निष्काळजी आणि बेजबाबदार कारभारावर स्थानिक ग्रामस्थ ॲड. सुशिल गायकवाड यांनी तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला आहे. प्रशासनाला एखाद्या मोठ्या दुर्घटनेची प्रतीक्षा आहे का? नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई झाली पाहिजे. जर हा विजेचा खांब लवकरात लवकर बदलण्यात आला नाही, तर महावितरणविरुद्ध तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ॲड. गायकवाड यांनी दिला आहे.

श्री बल्लाळेश्वर देवस्थानतर्फे १७४ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

पालीत मोठ्या उत्साहात सोहळा संपन्न

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देत आणि विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रम ांचा गौरव करत श्री बल्लाळेश्वर देवस्थान पाली यांच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव व पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी अत्यंत उत्साही आणि मंगलमय वातावरणात पार पडला.

भक्तनिवास क्रमांक २ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात तालुक्यातील इयत्ता दहावी, बारावी आणि पदवी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या तब्बल १७४ गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी अन्य क्षेत्रातील गुणीजणांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री बल्लाळेश्वर देवस्थानचे सरपंच जितेंद्र अरविंद गद्रे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या, तसेच देवस्थान ट्रस्टतर्फे शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांना सदैव पाठबळ दिले जाईल असा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी पालीचे नगराध्यक्ष पराग मेहता, नगरसेवक आरिफ मणियार, चंद्रकांत घोसाळकर, देवस्थानचे उपसरपंच वैभव मोहन आपटे, विश्वस्त प्रमोद जगन्नाथ पावगी, विश्वस्त अरुण दत्तात्रय गद्रे, विश्वस्त विश्वास विद्याधर गद्रे, विश्वस्त अमोल अशोक साठे आणि विश्वस्त डॉ. पिनाकिन सदानंद कुंटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्याचप्रमाणे व्यवस्थापक चंद्रशेखर सोमण व सह व्यवस्थापक पद्माकर फाटक यांच्यासह स्थानिक नागरिक, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोहळ्याचे नियोजन आणि व्यवस्थापन अत्यंत नेटकेपणाने पार पडल्याबद्दल उपस्थितांनी देवस्थान ट्रस्टचे मनःपूर्वक आभार मानले.

ओणमच्या रंगात न्हाऊन निघाले सीवुड्स

। खांदा कॉलनी । वार्ताहर ।

केरळच्या समृद्ध संस्कृतीचा मनमोहक आविष्कार ओणम ऑप्युलन्स २०२६च्या आठव्या आवृत्तीतून अनुभवायला मिळाला. सुमारे २५ फूट व्यासाच्या भव्य पूकलमने सजलेला परिसर कथकली, तिरुवाथिराकली, केरळ नटनम आणि चेंडाच्या दमदार तालाने दुमदुमून गेला. राजा महाबली, वामन, पूथन आणि थिरा या पौराणिक पात्रांच्या प्रत्यक्ष भेटीमुळे उत्सवात आणखी रंग भरला. कुटुंबांसह खरेदीसाठी आलेल्या नागरिकांनी केरळच्या परंपरा आणि संस्कृतीचा मनमुराद आनंद लुटला.

मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप

खांब : समीर दत्तात्रय भाटकर आणि दिपाली समीर भाटकर या दाम्पत्यांच्या वतीने माध्य. विद्यालय पढवण येथे विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. प्रास्ताविकात मुख्याध्याक संजीव शेरमकर यांनी भाटकर दांम्पत्यांचे कार्य समाजासमोर एक आदर्श आहे. हे अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. आपले मनोगत व्यक्त करताना भाटकरांनी विद्यार्थ्यांना नियमित शाळेत येण्याचं व मोठी स्वप्न पाहण्याचा मौलिक सल्ला देऊन पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा दिल्या. नानासाहेब भौड यांनी उभयतांच्या कार्याचा गौरव करताना विद्यार्थ्यांनी दातृत्व गुणांचा स्वीकार करावं हे आवाहन केले. विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्याचे वाटप झाल्यानंतर आपले मनोगत व्यक्त केले.

रोटरी क्लबतर्फे 'आशा की किरण'

। महाड । प्रतिनिधी ।

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ व रोटरी क्लब ऑफ महाड यांच्या संयुक्त विद्यमाने ङ्गआशा की किरण मातृ व बाल आरोग्यावर संवादफ या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचे आयोजन १९ ऑगस्ट विरेश्वर हॉल येथे करण्यात आले. महाड व पोलादपूर तालुक्यातील सुमारे १८० आशा सेविकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी उदयसिंह साळुंके तसेच महाड पंचायत समितीच्या सभापती प्रेरणा सावंत उपस्थित होत्या. यावेळी कार्यक्रम ाचे प्रमुख वक्ते सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतितज्ज्ञ डॉ. सना शेख आणि सुप्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ रोटेरियन डॉ. सुनील शेट यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटेरियन राजीव वनारसे, अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ महाड होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल सुकाळे यांनी केले, तर कार्यक्रम ाचे प्रास्ताविक डॉ. नूतन सुकाळे यांनी केले. आशा सेविकांच्या समन्वयासाठी योगिता तारळे यांनी विशेष सहकार्य केले. यावेळी रोटरी क्लब ऑफ महाडचे अध्यक्ष राजीव वनारसे यांनी रोटरी क्लबच्या विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांची माहिती देत आशा की किरण प्रकल्पाचा उद्देश आणि त्यामागील संकल्पना स्पष्ट केली.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतितज्ज्ञ डॉ. सना शेख यांनी गर्भवती माता व प्रसूतीनंतरच्या मातांच्या आरोग्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.या उपक्रमास पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तळा पोलिसांचे शहरातून रूट मार्च

। तळा । प्रतिनिधी ।

आगामी येत असलेल्या ईद-ए-मिलाद, गोपाळकाला व गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तळा पोलिसांकडून शहरात रूट मार्च काढण्यात आला.

शहरातील बळीचा नाका, नगरपंचायत नाका, वरचा मोहल्ला, मुळे नाका, मेठ मोहल्ला, आसावरी नाका आदी ठिकाणी हा रूट मार्च काढण्यात आला. या रूट मार्च मध्ये तळा पोलीस ठाणे येथील १ अधिकारी, ६ अंमलदार तसेच आरसिपी प्लाटून माणगाव येथील १ अधिकारी व २० जवान उपस्थित होते. यावेळी तळा शहरवासीयांनी येणारे सण हे शांततेत व जातीय सलोखा राखून साजरे करावे. सण साजरा करीत असताना अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घेऊन पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवा : सपोनि रवींद्र पारखे

। नागोठणे । प्रतिनिधी ।

आगामी काळात ईद-ए-मिलाद, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव आदी सण नागोठणे पोलीस ठाणे हद्दीतील नागोठणे शहरासह इतर सर्व गावांत साजरे केले जाणार आहेत. मी या पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यापासून नागोठणे शहर हे शांतताप्रिय असल्याचे आणि हिंदू मुस्लिम बांधवांमध्ये एकोपा असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे यापुढेही सर्वांनी आपापले सण कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून सण साजरे करावेत असे आवाहन नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि रवींद्र पारखे यांनी शांतता समितीच्या बैठकीत केले.

नागोठणे पोलीस ठाण्यात शनिवारी (दि.२२) सायंकाळी संपन्न झालेल्या शांतता समितीच्या या बैठकीला सोपान जांबेकर, अशपाक पानसरे, एकनाथ ठाकूर, किशोर म्हात्रे, अकबर पठाण, काजीम पानसरे, बाळू रटाटे, असगर सय्यद, जवके, निलोफर पानसरे, नंदा गायकवाड, राजेश्री टके, स्वप्निल भालेराव आदी पस्थित होते.

नारळी पौर्णिमा उत्सव साजरा करताना नदी ठिकाणी लहान मुले, वयस्कर व्यक्ती, महिला यांना सुरक्षित ठिकाणी राहण्याबाबत सूचना द्याव्यात, ईद-ए-मिलादचा उत्सव सामाजिक सलोखा, बंधुभाव व शांततेचा संदेश देत साजरा करावा, इतर धर्मियांच्या भावना दुखावल्या जातील असे कृत्य करू नये तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाल्यास तत्काळ पोलीस ठाण्यात कळविणे अशा विविध सूचना या बैठकी देण्यात आल्या.

याशिवाय नागोठण्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात रस्त्याच्या दुतर्फा बसणारे भाजी विक्रेते, शहरात बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे, प्रत्येक दहीहंडी ठिकाणी व इतर सणांच्या दिवसात पोलिसांची नेमणूक करणे, अशा प्रकारच्या अनेक सूचना या बैठकीत उपस्थित नागरिकांनी केल्या.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- pharmacist पाहिजे न्यू सिद्धांत मेडिकल अलिबाग -९११२११७०७९
- चौल-अलिबागमध्ये कॉटेज व वाडी २४ तास सांभाळण्यासाठी अनुभवी जोडपे/मुल/मुली पाहिजेत. जेवण करता येण अनिवार्य. संपर्क- ९८२००२९४५८.
- चेंढरे येथे सोसायटी/कनव्हेंस डीड झालेल्या नवीन इमारतीमधील तीन २ बीएचके रेडी पझेशन फ्लॅट विकणे आहेत. संपर्क - ८१८०८६१२३४/८१८०८५१२३४
- लक्ष्मी नारायण कृपा श्रीबाग नं.२ अलिबाग येथील २५०० स्क्वेअरफूट जागा बँक /ऑफिस/शैक्षणिक क्लासेस/ गेस्ट हाऊसकरीता पार्किंगसह भाड्याने देणे आहे. संपर्क - ८४५४८६२७६७/९२२०८४०३८८.
- १ bhk + balcony फॅमिली साठी फ्लॅट भाड्याने देणे आहे. लोकेशन: इंद्रप्रस्थ भाडे:१५,०००/- (निगोशिएबल) संपर्क: ९६३७२१३३८०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

शनिवार-रविवारी पर्यटकांची गर्दी | निसर्गसौंदर्य भरभरून अनुभवण्याची संधी

ताम्हिणी घाट पर्यटकांना खुणावतोय

। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।

सह्याद्रीच्या पर्वत रांगांमध्ये वसलेल्या पश्चिम घाटामध्ये असलेले निसर्गरम्य ठिकाण म्हणजे ताम्हिणी घाट. पावसाळ्यातील निसर्गसौंदर्य भरभरून अनुभवायचे असेल तर आवर्जून भेट द्यायला हवी ती ताम्हिणी घाटाला. पावसाळ्यात इथल्या टेकड्या कात टाकतात.

ह्यावर्षी जुलै महिन्यात पाऊस जोरात झाल्याने घाटातील २ रस्ते वाहून गेले. रस्त्याचे काम सुरु असताना १ महिना घाट बंद असल्याने पर्यटक नाराज होते .परंतु घाट सुरु झाल्याने आज रविवारी पर्यटकांनी एकच गर्दी केले. जड

वाहनांना बंद असलेने पोलिसांनी कडक बंदोबस्त ठवल्याने पर्यटक खुश आहे

वृक्ष करडा रंग टाकून हिरव्यागार शाली पांघरतात. इथे मुळशी धरणाचा नयनरम्य देखावाही बघायला मिळतो आणि या छोट्याशा वर्षासहलीला नदीतील साहसी खेळांची जोडही देता येते. ताम्हिणी घाटात जाण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गाने कोलाडपर्यंत जावे लागते. कुंडलिका नदीवरील पूल ओलांडला की, डाव्या बाजूला मुळशी धरणावरून पुढे पुण्याला जाणारा रस्ता लागतो. कोलाड आणि मुळशी धरणाच्या मधल्या भागात हा ताम्हिणी घाट आहे. थोड्या चढावरून पुढे गेले की, एखाद्या स्वप्नांच्या दुनियेतच आल्यासारखे वाटते. लांबच लांब पसरलेले हिरवेगार मखम ली गालिचे, ओथंबून खाली आलेले काळे ढग, खळाळणारे निर्झर धबधबे पाहताना डोळ्यांचे पारणे फिटते. पावसाळ्यात तयार होणारे इथले पाण्याचे काही प्रवाह शांतपणे डोंगरावरून खाली येतात तर काही धबधबे डोंगरावरून अक्षरश: कोसळत खाली येतात. तिथून उसळून पुढे वाहणारे हे पाणी बघायला पर्यटक इथे गर्दी करतात. घाटातल्या वळणा वळणावर नयनरम्य, विहंगम देखावे जणू काही आपली वाटच पाहात असतात. पावसाळी धुक्यात जणू काही डोकी हरवलेल्या टेकड्या आकाशात उंच झेपावत आहेत, असे वाटते. टेकड्यांच्या या भल्या-थोरल्या भतीवर अलगद उतरणारे ढग वातावरण भारावून टाकतात.

गाढी नदीवरील पुलाचा कठडा धोकादायक

■ प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अपघाताची भीती

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

पनवेल शासकीय विश्रामगृहाजवळील जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील गाढी नदीवरील पुलाच्या संरक्षण कठड्याची दुरवस्था झाली आहे.पुलाच्या कठड्यावरील सिमेंटचे मोठमोठे तुकडे निघून पडत असल्याने हा कठडा कम कुवत झाला आहे. कठड्याची अवस्था पाहता तो कोणत्याही वेळी नदीपात्रात किंवा रस्त्यावर कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे.

या पुलावरून दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा सुरू असते. विशेषतः अवजड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असल्याने पुलावर सतत कंपन निर्माण होतात. या कंपनांमुळे आधीच जीर्ण झालेल्या संरक्षण कठड्याला धोका निर्माण झाला आहे. कठड्याचा एखादा भाग अचानक रस्त्यावर कोसळल्यास वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तर नदीच्या बाजूचा भाग कोसळल्यास गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. रात्रीच्या वेळी कठड्याचा भाग अचानक कोसळल्यास दुर्घटनेची तीव्रता आणखी वाढू शकते. या मार्गावरून दररोज हजारो नागरिक तसेच प्रवासी ये-जा करीत असतात.

पनवेल शहरातून पुढे पुणे, गोवा तसेच जेएनपीटीकडे जाण्यासाठी हा महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे या पुलावरील वाहतुकीची वर्दळ दिवसभर मोठ्या प्रमाणात असते. पुलाच्या कठड्याला काही ठिकाणी भेगा पडल्या असून बांधकामातील सिमेंटचे आवरणही निघून गेले आहे. काही ठिकाणी लोखंडी सळ्या व इतर भाग उघडे पडल्याचे चित्र दिसत आहे. पुलाच्या कठड्याची तातडीने तांत्रिक तपासणी करण्याची गरज आहे.

मात्र, अद्याप या समस्येकडे संबंधित प्रशासनाचे गांभीर्याने लक्ष गेले नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. दररोज या मार्गावरून अनेक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी प्रवास करतात. त्यामुळे पुलाच्या दुरवस्थेकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची मागणी होत आहे. संरक्षण कठडा पूर्णपणे कोसळण्याची वाट न पाहता त्याची तातडीने डागडुजी करणे आवश्यक आहे. गरज भासल्यास धोकादायक भागाला तात्पुरते संरक्षक कुंपण व इशारा फलक लावावेत. पुलाच्या सुरक्षिततेबाबत संबंधित विभागाने पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

पावसाळ्यात पुलाच्या परिसरात पाणी व ओलावा वाढत असल्याने जीर्ण बांधकामाच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. अवजड वाहनांच्या सततच्या वाहतुकीमुळे पुलाच्या संरचनेवर होणाऱ्या परिणामाचीही तपासणी करणे गरजेचे आहे.

कठड्याचा काही भाग रस्त्यावर पडल्यास वाहतुकीलाही मोठा अडथळा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे केवळ कठड्याची डागडुजी न करता पुलाची संपूर्ण संरचनात्मक पाहणी करण्याची गरज आहे. नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होण्यापूर्वी प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून धोकादायक भागाची दुरुस्ती करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पुलावरील संरक्षण कठडा मजबूत करण्याबरोबरच भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे एखादी दुर्घटना घडण्याची वेळ येऊ नये, अशी प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

राष्ट्रीय महामार्गावर पुन्हा खड्ड्यांचे साम्राज्य

कळंब जवळ वाहनचालकांची जीवघेणी कसरत

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्गावरील कळंबचा हा वळणदार रस्ता खड्ड्यांच्या विळख्यात सापडतो, यंदाही त्याला अपवाद ठरला नाही. कळंब पोलीस स्टेशनच्या पुढील धोकादायक वळणावर सध्या प्रचंड मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन वाहने चालवावी लागत आहेत. कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्ग हा महत्त्वाचा मार्ग असून या मार्गावर दिवसभर मोठ्या संख्येने अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते.

राष्ट्रीय महामार्ग रस्त्याचे नाव देण्यात आलेल्या कर्जत मुरबाड मार्गवरील कळंब गावाजवळील रस्ता अद्याप काँक्रीटचा बनवला नाही. कळंबजवळील या वळणाचा भाग अद्याप काँक्रीट करण्यात आलेला नाही. रस्ता सरळ करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या पुलाचे काम अनेक वर्षांपासून रखडल्याने वळणाचा हा भाग अपूर्ण राहिला आहे. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात याच ठिकाणी मोठमोठे खड्डे पडत असल्याचे चित्र आहे.राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या अखत्यारीत असलेल्या शहापूर मुरबाड कर्जत खोपोली या राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची तात्पुरती कार्यवाही केली जाते.त्यात पाऊस आणि अवजड वाहनांच्या सततच्या वाहतुकीमुळे काही दिवसांतच हे खड्डे पुन्हा उखडतात. त्यामुळे खड्डे बुजविण्याची तात्पुरती मलमपट्टी करून प्रश्न सुटत नसल्याचे दरवर्षी दिसून येत आहे.पावसाचे पाणी खड्ड्यांमध्ये साचल्याने त्यांची खोली वाहनचालकांच्या लक्षात येत नाही. अचानक खड्डा समोर आल्याने वाहनांचा वेग कमी करताना किंवा खड्डा चुकवताना अपघाताचा धोका निर्माण होत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना या मार्गावरून जाताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

येरळची ग्रामसभा संपन्न

सुतारवाडी : ग्रामपंचायत येरळची तहकूब ग्रामसभा २१ ऑगस्ट २०२६ रोजी सरपंच सुरेश जाधव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी उपसरपंच, सर्व सदस्य, माजी सदस्य, ग्रामसेवक, ग्रामपंचायत हद्दीतील सर्व ग्रामस्थ उपस्थित होते. जनरल सभेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षपदी सुरेश गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. निवडीनंतर सरपंच उपसरपंच विविध गावातील ग्रामस्थ यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.

मोबाईल : ९८६०६५८५६५

सुतारवाडी परिसरात तापाची साथ

सुतारवाडी : सुतारवाडी आणि अन्य परिसरात गेल्या पंधरा दिवसापासून ताप थंडी डोकेदुखी चक्कर येणे सर्दी खोकला असे प्रकार व्यक्तींना होत आहेत. अशावेळी रुग्णांना खाजगी दवाखाने परवडत नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडीच्या डॉक्टरांना सदरील घटना समजताच डॉ. कोठुळे, आरोग्य कर्मचारी गणेश शिरसाठ, निशिकांत सानप, परिचारिका गायत्री सिंग, अशा सेविका दळवी, ताम्हणकर, आदी घरोघरी फिरून रुग्णांची तपासणी करून औषध गोळ्या दिल्या. डॉ. कोठुळे, यांनी दत्त मंदिरात उपस्थित राहून दिवसभर रुग्णांची तपासणी केली.

बरडावाडी येथे आदिवासींचा भव्य मेळावा

। पेण । प्रतिनिधी ।

दळी व वैयक्तिक वनहक्क दावेदारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी साकव संस्थेच्या वतीने बरडावाडी येथे आदिवासींचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला. पाबळ खोऱ्यातील वरप, पाबळ, जीर्णे व महालमीरा डोंगर या चार ग्रामपंचायत क्षेत्रांतील २९ वाड्यांमधून सुमारे ६०० आदिवासी बांधव सहभागी झाले.

दळी जमिनींचे वारस नोंदणी, फार्मर आयडी, ई-केवायसी, प्रलंबित दावे निकाली काढणे तसेच नवीन वनहक्क दावे दाखल करण्याबाबत मेळाव्यात मार्गदर्शन करण्यात आले. कृषी विभागाच्या वतीने ई-केवायसी व फार्मर आयडीची माहिती देण्यात आली, तसेच रानभाज्यांचे प्रदर्शनही भरविण्यात आले.

साकव संस्थेचे सचिव अरुण शिवकर यांनी संस्थेच्या माध्यमातून दाखल करण्यात आलेल्या ६२४ वैयक्तिक वनहक्क दाव्यांपैकी ५१० दावे मंजूर झाल्याची माहिती दिली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रायगड जिल्ह्यातील सुमारे १८ हजार आदिवासींना महसुली सातबारा देण्याबाबत घेतलेल्या निर्णयाचे स्वागत करून त्यांच्या अभिनंदनाचा ठराव यावेळी मंजूर करण्यात आला.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी खुमा दोरे होते. कृषी व महसूल विभागाचे अधिकारी, साकव व वनराई संस्थेचे पदाधिकारी तसेच आदिवासी प्रतिनिधी उपस्थित होते. मेळावा यशस्वी करण्यासाठी पांडू शिंगवा, उमा दोरे, अशोक निरगुडा, कमळाकर मेंगाळ, राजू बांगारा, लक्ष्मण खंडू वीर, कमलाकर काष्टे यांच्यासह कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

विद्यार्थ्यांची पाण्यातून प्रवास करण्याची शर्यत बंद

जिल्हा परिषद सदस्यांनी वैयक्तिक खर्चातून केली रस्त्याची दुरुस्ती

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ येथील पोस्ट ऑफिस समोरील रस्त्यावर साचलेले पाणी आणि खड्ड्यांमुळे नागरिक व शालेय विद्यार्थ्यांची होणारी जीवघेणी कसरत अखेर थांबली आहे.

शालेय विद्यार्थ्यांची कसरत समाज माध्यमांवर व्हायरल झाल्यावर नेरळ जिल्हा परिषद गटाच्या सदस्य सुनिता मोरे यांनी या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करून घेतली.

नेरळ विद्यामंदिर शाळेत जाणाऱ्या तब्बल एक हजारहून अधिक विद्यार्थ्यांना आणि शनी पॅलेस परिसरात राहणाऱ्या लोकांना नेरळ पोस्ट ऑफिस भागातून जाणाऱ्या रस्त्याचं त्रास सहन करावा लागत होता.विद्यार्थ्यांसह हजारो नागरिक दररोज या रस्त्यावरून प्रवास करतात.

परंतु पावसाचे पाणी आणि सांडपाणी साचल्यामुळे रस्त्याला तलावाचे स्वरूप आले होते. लहान मुलांना ७ ते ८ फूट खोल असलेल्या गटाराच्या अरुंद काठावरून जीव मुठीत धरून चालावे लागत होते. स्थानिक नागरिकांनी नेरळ ग्रामपंचायत व प्रशासकांकडे वारंवार तक्रारी करूनही या समस्येकडे दुर्लक्ष करण्यात आले होते.

याबाबत समाज माध्यमांवर येथील विद्यार्थ्यांनी रस्त्याची अवस्था दर्शवली होती.जिल्हा परिषद सदस्या सुनीता मोरे यांनी तत्परता दाखवत स्वतःच्या वैयक्तिक खर्चातून जेसीबीच्या साह्याने रस्ता दुरुस्ती आणि तुंबलेल्या गटाराचा मार्ग मोकळा करून दिला आहे.

अखेर ग्रामस्थांनी जिल्हा परिषद सदस्या सुनीता मोरे यांच्याकडे धाव घेतली.१५ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यानंतर सुनीता मोरे यांनी कोणत्याही सरकारी निधीची वाट न पाहता स्वतःच्या खर्चाने तात्काळ जेसीबी पाचारण केले. तुंबलेले गटार साफ करून खडी व मातीच्या सहाय्याने रस्ता सपाट करण्यात आला.

> **नागरिक व विद्यार्थ्यांचे हाल लक्षात घेऊन आम्ही तत्काळ स्वखर्चाने हे काम पूर्ण केले. ग्रामस्थांची कोणतीही समस्या असल्यास २४ तासांच्या आत ती सोडवण्याचा आमचा प्रयत्न राहील.**
>
> **- सुनीता मोरे**
> **(जिल्हा परिषद सदस्या)**

प्रशासकीय दिरंगाईला आणि जुमानता दाखवलेल्या या तत्परतेमुळे नेरळ येथील खंडा भागातील रस्त्याची अवस्था दयनीय झाली होती तो रस्ता दोन तासात चांगला बनला आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकती त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेली आहेत.

मौजे इंजिवली, तालुका कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकती

मालकाचे नाव	सर्वे नं.	प्लॉट नं.	क्षेत्र आर.चौ.मी	आकार रू. पै.
अलोक मोतीचंद शहा	२०	२/ब	२५००.००	२५०.००
अलोक मोतीचंद शहा	२०	५	१५००.००	१५०.००

सदरची बिनशेती मिळकती ह्या वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील बिनशेती मिळकती या तद्गभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहेत. तरी वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २४/०८/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
ॲड. स्वप्निल बाबूराव देशमूख
पत्ता. सदनिका नं. ५०४, ५ वा मजला, गजवक्र रेसिडेंन्सी, कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८८३०५६०९६२/९२७३२२४६८०

जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनिल बाळाराम मुंडे यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (आर.चौ.मी.)	आकार (रू. पैसे)
नागांव ता. अलिबाग जि. रायगड	७४७/२	क्षेत्र ०.१९.२० पोख ०.०१.८० एकुण ०.२१.००	१.६०

वर नमुद मिळकतीपैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे क्षेत्र ०.१०.५० हे. आर.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त , साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २१/०८/२०२६

ॲड. विजय अनंत पेढवी
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

जा.क्र.१५६३/२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
मालमत्ता क्रमांक ६२५, मारुती मंदिराजवळ
मु. पो. चेंढरे, अलिबाग जि. रायगड

चौकशीची जाहीर नोटीस दि. २१/०८/२६

नियम ७ अ प्रमाणे

अर्ज क्रमांक :- ३०३/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- रावबहादुर नारायण मेघाजी लोखंडे प्रतिष्ठान.....बाबत.

श्री. गोपीनाथ वसंत लोखंडे ...अर्जदार
रा. मुंबई पुणे हायवे, कोहीनुर टेक्नीकल समोर, लक्ष्मी वसाहत, झोपडपट्टी, ता. पनवेल, जि. रायगड

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेला नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम - ५००० /- रुपये

(ब) स्थावर मिळकत : (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मी सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २१.०८.२०२६ रोजी दिली

सही/-
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग, रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकती त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेली आहेत.

मौजे कोशाणे, तालुका कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकती

मालकाचे नाव	सर्वे नं.	प्लॉट नं.	क्षेत्र आर.चौ.मी	आकार रू. पै.
१) नारायण काळूलालजी त्रिवेदी २) सिता नारायण त्रिवेदी	५५/१/अ	५	२८५	२८-५०
१) नारायण काळूलालजी त्रिवेदी २) सिता नारायण त्रिवेदी	५५/१/अ	६	२८५	२८-५०

सदरची बिनशेती मिळकती ह्या वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील बिनशेती मिळकती या तद्गभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहेत. तरी वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणा-या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. २४/०८/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
ॲड. स्वप्निल बाबूराव देशमूख
पत्ता. सदनिका नं. ५०४, ५ वा मजला, गजवक्र रेसिडेंन्सी, कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८८३०५६०९६२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन
मौजे पुनाडे, ता. उरण, जि.रायगड

भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर.पॉ	आकारणी रु.पै.
१३०/१६२	एकूण क्षेत्र ०-४९-३० हे.आर	६.६३
१३०/१८६	एकूण क्षेत्र ०-६२-०० हे.आर	८.३१
१३१/३६	एकूण क्षेत्र ०-५५-९० हे.आर	३.००

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-२४ /०८/२०२६

सही/-
ॲड. रोहित रो. मानकवळे
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल

१) शांतनू सहाय व २) कंचन समतानी, रा. मुंबई यांच्या मालकीची मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथे गट नं. ५७/२, क्षेत्र ६८.६०.०० आर स्क्वेअर मिटर्स आकार ६८६ रुपये या वर्णनाची बिनशेती मिळकत आहे.

सदर मिळकतीचे दक्षिण- पुर्वेस लगत श्री. नितीन अरविंद पाटील, सुप्रिया सुनिल पाटील व स्नेहल राजेंद्र भगत यांचे मालकीची मौजे झिराड, गट नं. ७६, क्षेत्र ० हे. ६३ आर, आकार १२.७० ही मिळकत आहे. आमच्या अशिलांच्या मालकीच्या गट नं. ५७/२ या मिळकतीच्या उत्तरेकडे असलेल्या पक्क्या गावरस्त्यापासून सदरचे गट नं. ७६ या मिळकतीमध्ये जाण्या-येण्याकरीता कधीही कोणत्याही प्रकारचा रस्ता उपलब्ध नव्हता. परंतू आमच्या अशिलांनी मिळकत विकत घेतल्यानंतर, श्री. अरविंद नथुराम पाटील यांनी विनंती केल्यावरून त्यांच्या सोईकरीता आमचे अशिलांनी त्यांस गट नं. ५७/२ या मिळकतीमधून शेतीच्या कामाकरीता पायी येण्या-जाण्यासाठी तोंडी परवानगी दिली होती व त्या परवानगीच्या आधारे श्री. अरविंद नथुराम पाटील हे त्यांच्या गट नं. ७६ या मिळकतीमध्ये आमच्या अशिलांच्या गट नं. ५७/२ या मिळकतीमधून ये-जा करीत होते.

अशी वस्तूस्थिती असताना आता आमच्या अशिलांच्या असे निदर्शनास आले आहे की, श्री. अरविंद नथुराम पाटील यांचे वारस श्री. नितीन अरविंद पाटील, सुप्रिया सुनिल पाटील व स्नेहल राजेंद्र भगत यांनी त्यांच्या मालकीची गट नं. ७६ ही मिळकत विकावयास काढली आहे व ते इच्छूक खरेदीदार, इस्टेट एजंट व ब्रोकर यांस गट नं. ७६ या मिळकतीमध्ये जाण्या-येण्याकरीता गट नं. ५७/२ या मिळकतीमधून रस्ता असल्याची बतावणी करीत आहेत. सदरचे त्यांचे कृत्य हे चुकीचे व बेकायदेशीर आहे. त्यामुळे गट नं. ७६ ही मिळकत विकत घेऊ इच्छिणाऱ्या इसमांस वस्तूस्थितीची माहिती व्हावी व मागाहून रस्त्याच्या कारणावरून आमचे अशिल व इच्छूक खरेदीदारांमध्ये कोणत्याही प्रकारचा तंटा बखेडा निर्माण होऊ नये, याकरीता आमचे अशिल सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

सबब तमाम जनतेस, विशेषतः मौजे झिराड गट नं.७६ ही मिळकत विकत घेऊ इच्छिणाऱ्या व त्या मिळकतीचे खरेदी-विक्रीमध्ये मध्यस्थी करणाऱ्या इसमांस याद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे झिराड गट नं.७६ या मिळकतीमध्ये जाण्या-येण्याकरीता आमच्या अशिलांच्या मालकीच्या गट नं. ५७/२ या मिळकतीमधून कोणत्याही प्रकारचा वहिवाटीचा रस्ता कधीही नव्हता, नाही अथवा उपलब्ध होणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : २४/८/२०२६

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

कांगारूंनी घेतला पराभवाचा बदला

। मॅके । वृत्तसंस्था ।

ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेश यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा आणि अखेरचा सामना मॅकेच्या ग्रेट बॅरियर रीफ एरिना मैदानावर खेळवण्यात आला. या सामन्यात यजमान ऑस्ट्रेलियाने बांगलादेशचा डाव आणि ५१ धावांनी पराभव केला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने दोन सामन्यांची कसोटी मालिका १-१ अशी बरोबरीत संपवली.

ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव २१० धावांवर संपला होता. मात्र, पहिल्या डावात बांगलादेशला केवळ ६४ धावाच करता आल्या होत्या. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला १४६ धावांची मोठी आघाडी मिळाली. ऑस्ट्रेलियाकडून कॅमेरॉन ग्रीनने ६७ धावांची खेळी केली. स्टीव्ह स्मिथने ४२ धावा केल्या, तर नॅथन लायन ३२ धावांवर नाबाद राहिला. बांगलादेशकडून शोरिफुल इस्लामने शानदार गोलंदाजी करत ७ बळी घेतले. तसेच तैजुल इस्लाम, मेहदी हसन मिराज आणि तस्किन अहमद यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

बांगलादेशवर डाव अन् ५१ धावांनी विजय

कसोटी मालिका बरोबरीत संपवली

फॉलोऑन मिळाल्यानंतर मैदानात उतरलेल्या बांगलादेशला ऑस्ट्रेलियाच्या वेगवान गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच धक्के दिले. मिचेल स्टार्कने आपल्या दुसऱ्या षटकात सलग दोन चेंडूंवर शदमन इस्लाम आणि मोमिनुल हक यांना बाद करत बांगलादेशची अवस्था बिकट केली.

मिचेल स्टार्क ठरला हिरो

यावेळी ऑस्ट्रेलियाच्या विजयाचा सर्वात मोठा हिरो मिचेल स्टार्क ठरला. पहिल्या डावात त्याने अवघ्या १२ धावा देत ६ बळी घेतले होते. दुसऱ्या डावातही स्टार्कचा धडाका कायम राहिला. त्याने आणखी चार फलंदाजांना माघारी पाठवत संपूर्ण सामन्यात त्याने ५१ धावा देत १० बळी आपल्या नावावर केले. ही कामगिरी स्टार्कच्या कसोटी कारकिर्दीतील एका सामन्यातील दुसरी सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे. विशेष म्हणजे कसोटी क्रिकेटमध्ये एका सामन्यात १० किंवा त्याहून अधिक बळी घेण्याची त्याची ही चौथी वेळ आहे.

त्यानंतर पॅट कमिन्सने तंझीद हसन तमीमला बाद करत बांगलादेशला आणखी एक धक्का दिला. कर्णधार नजमुल हुसैन शांतो आणि मुशफिकुर रहीम यांनी २७ धावांची भागीदारी करत डावाला थोडा आधार दिला. मात्र, नॅथन लायनने शांतोला बाद करत ही भागीदारी मोडली आणि त्यानंतर पुन्हा एकदा बळींची रांगच लागली. टी-ब्रेकनंतर लगेचच बांगलादेशचा डाव संपुष्टात आला. मुशफिकुर रहीमने एका बाजूने झुंज देत २९ धावा नाबाद केल्या, तर कर्णधार नजमुल हुसैन शांतोने ३१ धावांची सर्वाधिक खेळी केली. याशिवाय एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. यावेळी बांगलादेशचा संपूर्ण संघ अवघ्या ९५ धावांवर सर्वबाद झाला. त्यामुळे मॅके कसोटीचा निकाल अवघ्या दोन दिवसांत लागला. ऑस्ट्रेलियाच्या या विजयाचा हिरो वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क हा ठरला. त्याने बांगलादेशच्या दुसऱ्या डावात ४ बळी घेतले. त्याला कर्णधार पॅट कमिन्स आणि नॅथन लायन यांनी प्रत्येकी ३ बळी घेत चांगली साथ दिली. ऑस्ट्रेलियाने हा सामना डाव आणि ५१ धावांनी जिंकला आणि पहिल्या कसोटीतील पराभवाचा वचपा काढत मालिका १-१ अशी बरोबरीत सोडवली.

अनोखा पराक्रम

या सामन्यात एक अनोखा पराक्रम पाहायला मिळाला. मिचेल स्टार्क आणि शोरिफुल इस्लाम या दोन्ही डावखुऱ्या वेगवान गोलंदाजांनी काही तासांच्या अंतराने ६-६ बळी घेतले. कसोटी क्रिकेटच्या १४९ वर्षांच्या इतिहासात एकाच सामन्यात दोन डावखुऱ्या वेगवान गोलंदाजांनी ६ बळी घेण्याची ही केवळ दुसरी वेळ ठरली. यापूर्वी असा पराक्रम १९५८-५९ च्या नववर्ष ऍशेस कसोटीत झाला होता.

निवडक

कर्ण शर्माची आंतरराष्ट्रीय निवृत्ती

नवी दिल्ली : कोलंबोमध्ये भारतीय वरिष्ठ क्रिकेट संघ श्रीलंकेविरुद्ध दुसरा कसोटी सामना खेळण्यात व्यस्त आहे. अशातच एका अनुभवी फिरकीपटूने निवृत्ती जाहीर केली आहे. भारताचा लेगस्पिनर कर्ण शर्मा याने आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेटबरोबर सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. कर्णने त्याच्या निवृत्तीची घोषणा शनिवारी (दि.२२) रात्री युपी टी लीगमधील कानपूर सुपरस्टार्स विरुद्ध मेरठ मॅव्हरिक्स या सामन्यानंतर केली. लखनऊच्या एकाना स्टेडियमवर त्याने आपल्या कारकिर्दीतील शेवटचा सामना खेळला. कर्ण शर्माने निवृत्त होताना म्हटले, ''मला आता निवृत्त व्हायचे आहे. मी माझे कुटुंब, बीसीसीआय, रेल्वे, यूपीसीए, आंध्र, विदर्भ क्रिकेट असोसिएशन आणि या संपूर्ण प्रवासात मला पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाचा मी आभारी आहे.'' कर्णने २००७-०८ च्या देशांतर्गत हंगामातून प्रथम श्रेणी, लिस्ट ए आणि टी २० पदार्पण केले. त्याने आपल्या पहिल्याच रणजी ट्रॉफीच्या सामन्यात शतकी खेळी केली. त्याने रणजी ट्रॉफी २००७ मध्ये रेल्वेकडून खेळताना जम्मू-काश्मीरविरुद्ध १२० धावांची खेळी केली होती. तसेच, कर्णचा २०१२-१३ हंगाम सर्वांत यशस्वी ठरला. त्याने त्यामधील तीन रणजी ट्रॉफीच्या सामन्यांमध्ये २१ बळी घेतले आणि सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटूचा पुरस्कार जिंकला. त्यानंतर त्याला २०१४ च्या आयपीएल लिलावामध्ये विक्रमी किंमत मिळाली.कर्णने ९७ प्रथम श्रेणीच्या सामन्यांमध्ये २७० बळी घेतले आणि २८६६ धावा केल्या.

टीकाकारांना गंभीरचे सडेतोड उत्तर

नवी दिल्ली : भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर याने बाहेरच्या चर्चा आणि सोशल मीडियावरील गदारोळाबाबत स्पष्ट आणि रोखठोक प्रतिक्रिया दिली आहे. कोलंबोमध्ये श्रीलंकेविरुद्ध होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना गंभीरने स्पष्ट केले की, त्याचे काम लोकांना खुश करण्यासाठी 'लाईक्स' आणि 'व्ह्यूज' मिळवणे नसून, संघासाठी ट्रॉफी जिंकणे हे आहे. त्याने कसोटी क्रिकेटमधील संघाची कामगिरी आणि रँकिंगबाबतच्या प्रश्नांनाही स्पष्टपणे उत्तरे दिली. यावेळी गंभीरने सांगितले की, भारतीय संघ खराब कामगिरी करत नाहीये, तर तो एका संक्रमण काळातून जात आहे. अशा काळात चढ-उतार होणे स्वाभाविक आहे. संघाभोवती चालणाऱ्या बाहेरच्या चर्चांचा त्याच्यावर काहीही परिणाम होत नाही. त्याच्या मते, संघ व्यवस्थापन सोशल मीडियावरील प्रतिक्रिया, लाईक्स किंवा व्ह्यूजपेक्षा मैदानावरच्या कामगिरीवर आणि ट्रॉफी जिंकण्यावर लक्ष केंद्रित करते. तो म्हणाला, ''माझे काम ट्रॉफी जिंकणे आहे, लाईक्स आणि व्ह्यूज मिळवणे नाही.'' तसेच, कसोटी संघाचे रँकिंग आणि अलीकडील कामगिरीबाबतच्या प्रश्नांना उत्तर देताना गंभीरने संघर्ष करत असल्याचा मुद्दा फेटाळून लावला. त्याने स्पष्ट केले की, संघ अडचणीत नाही, तर सध्या एका संक्रमण काळातून जात आहे. त्याने हे देखील नमूद केले की, या दौऱ्यादरम्यान काही निकाल अपेक्षेप्रमाणे न लागण्याची शक्यता असू शकते. गंभीरचे असे मानणे आहे की, जेव्हा संघ बदलांच्या प्रक्रियेतून जात असतो, तेव्हा प्रत्येक सामन्यात सारखीच कामगिरी करणे शक्य नसते. त्याने सांगितले की, या काळात कामगिरीत चढ-उतार होऊ शकतात, परंतु त्याकडे संघ संघर्ष करत आहे अशा दृष्टीने पाहू नये.

पंतच्या दुखापतीमुळे चिंतेचे वातावरण

कोलंबो : श्रीलंका विरुद्ध भारत संघातील सामन्यात रिषभ पंतला अचानक मैदानातून बाहेर जावे लागल्याची घटना घडली. सध्या भारताचा संघ आधीच अनेक खेळाडूंच्या दुखापतीने चिंतेत आहे. या सामन्यापूर्वी कुलदीप यादवही आजारी पडल्याने खेळू शकलेला नाही. त्यातच आता पंतला रिटायर्ड हर्ट व्हावे लागल्याने या चिंतेत भर पडली आहे. या सामन्यातील ५८ व्या षटकाला सुरुवात झाली आणि पहिलाच चेंडू लहिरू कुमाराने आखुड टप्प्याचा टाकला. त्यावर पंतने पुल शॉट खेळण्याचा प्रयत्न केला. परंतु, तो चेंडू पंतच्या हाताला लागला आणि मागे गेला. तो चेंडू त्याच्या मनगटाच्या हाडावर लागल्याचे दिसत होते. त्यामुळे पंतला वेदना होत होत्या आणि तो अस्वस्थ वाटत होता. त्यामुळे फिजिओ बर्फाची पिशवी घेऊन मैदानात आले. त्याच्यावर मनगटावर बराचवेळ उपचार सुरू होते. त्याच्या मनगटाला टेपही लावण्यात आलेला. परंतु, तो नंतर काढण्यात आला आणि पंचांशी चर्चा केल्यानंतर अखेर पंत ३ धावांवर रिटायर्ड हर्ट होत मैदानातून बाहेर गेला. त्यामुळे रवींद्र जडेजा पडिक्कलला साथ देण्यासाठी मैदानात उतरला. यावेळी भारताच्या डगआऊटमध्ये पंतच्या मनगटावर उपचार सुरू असल्याचेही दिसत होते. तसेच त्याचे मनगट बर्फाच्या पिशवीने शेकले जात होते. त्याला पट्टीही बांधण्यात आली. त्यामुळे आता भारतीय संघाला हीच आशा असेल की पंतची दुखापत फार गंभीर नसावी आणि तो पुन्हा फलंदाजीला यावा.



मेस्सीच्या सहकाऱ्यांवर कारवाईचा बडगा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

स्पेनने फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात गतविजेत्या अर्जेंटिनावर विजय मिळवला होता; परंतु, या सामन्यानंतर अर्जेंटिनाच्या लिआंद्रो पारेडेसने स्पेनच्या खेळाडूचा गळा पकडला आणि त्याला खाली पाडून मारल्याची घटना घडली. त्यावर फिफा या जागतिक संघटनेने लिओनेल मेस्सीच्या या सहकाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. पारेडेसनला १० सामन्यांची बंदी घालण्यात आली असून, सहकारी नाहुएल मोलिनावर सात सामन्यांची बंदी घालण्यात आली आहे.

रविंद्र जडेजाच्या नावावर विक्रम

। कोलंबो । वृत्तसंस्था ।

भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याला कोलंबोच्या सिंहली स्पोर्ट्स क्लब मैदानावर सुरुवात झाली आहे. या सामन्यात भारतीय संघाचा अष्टपैलू खेळाडू रविंद्र जडेजाने मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यातील ही दोन सामन्यांची मालिका आहे. पहिल्या कसोटीत भारतीय संघाने श्रीलंकेचा १६५ धावांनी पराभव करत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली होती. त्यामुळे दुसऱ्या कसोटीत विजय मिळवत मालिका २-० ने जिंकण्याच्या इराद्याने भारतीय संघ मैदानात उतरला आहे. दरम्यान, जडेजाने आतापर्यंत जागतिक कसोटी अजिंक्यपदमध्ये ४९ सामने खेळले होते. श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत मैदानात उतरताच त्याने ५० सामन्यांचा टप्पा गाठला. अशी कामगिरी करणारा जडेजा भारताचा पहिलाच खेळाडू ठरला आहे. त्यामुळे श्रीलंकेविरुद्धचा हा सामना जडेजासाठी खास ठरला आहे. जडेजानंतर डब्ल्युटीसीमध्ये भारतासाठी सर्वाधिक सामने खेळणाऱ्या खेळाडूंच्या यादीत विराट कोहली दुसऱ्या क्रमांकावर आहे.

खारघर हिल मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

पनवेल महानगर पालिकेच्यावतीने 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन'चे आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉनला धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी मराठी चित्रपट सृष्टीतील लोकप्रिय अभिनेते अंकुश चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीमुळे मॅरेथॉनला विशेष आकर्षण प्राप्त झाले.

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आयोजित देशातील पहिल्या ४२ किलोमीटर अंतराच्या 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन'ला महाराष्ट्रभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे ९ हजार धावपटूंनी सहभाग घेतल्याने खारघर परिसर धावपटूंनी गजबजून गेला होता. पहाटे ४.३० वाजता महापौर नितीन पाटील, मुख्य प्रवर्तक परेश ठाकूर, जिल्हाधिकारी किशन जावळे, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, महापालिका आयुक्त मंगेश चितळे, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, उपमहापौर प्रमिला पाटील यांच्यासह विविध पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत मॅरेथॉनला सुरुवात झाली. यावेळी अभिनेता अंकुश चौधरी आणि आयपीएस अधिकारी कृष्णप्रकाश यांनीही मॅरेथॉनच्या प्रारंभी उपस्थित राहून धावपटूंचा उत्साह वाढवला. या स्पर्धेत नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, माजी आयुक्त सुधाकर देशमुख, ठाण्याचे सहायक पोलीस आयुक्त आदिनाथ बुधावर, उपजिल्हाधिकारी राहुल सूर्यवंशी, ठाणे पोलीस उपायुक्त शैलेश काळे यांच्यासह अनेक प्रशासकीय अधिकारी सहभागी झाले होते. या मॅरेथॉनच्या माध्यमातून खारघरच्या निसर्गरम्य डोंगररांगा, हिरवाई आणि स्वच्छ हवेच्या सान्निध्यात धावण्याचा आगळावेगळा अनुभव धावपटूंना मिळाला. या स्पर्धेत ४२ किमी फुल आणि २१ किमी हाफ मॅरेथॉन, १० किमी, ५ किमी रन आणि ३ किमी फन रन अशा विविध प्रकारांचा समावेश होता. यावेळी लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत तसेच महिला आणि विविध वयोगटातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. तसेच, दिव्यांग बांधवांनीही सहभाग घेतल्याने उपस्थितांचे लक्ष वेधले.

'फिट पनवेल, हेल्दी पनवेल'

'धावूया आरोग्यासाठी, धावूया फिटनेससाठी, धावूया पर्यावरणासाठी आणि धावूया पनवेलच्या अभिमानासाठी' या संकल्पनेतून पनवेल महानगरपालिकेने 'फिट पनवेल, हेल्दी पनवेल'चा संदेश दिला. यास्पर्धेच्यावेळी पनवेल महानगर पालिकेचे महापौर नितीन पाटील, सन्मानीय नगरसेवक, आयुक्त, सहआयुक्तांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

रोबोटने मोडला बोल्टचा विक्रम

। बीजिंग । वृत्तसंस्था ।

चिनी कंपनी 'तियानझुओ' किंवा बीजिंग ह्युमनॉइड रोबोट इनोव्हेशन सेंटरने विकसित केलेल्या ह्युमनॉइड रोबोटने १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत मानवी जागतिक विक्रम मोडला आहे. दुसऱ्या 'वर्ल्ड ह्युमनॉइड रोबोट गेम्स'च्या प्राथमिक फेरीत या रोबोटने अवघ्या ९.३९ सेकंदात १०० मीटरची शर्यत पूर्ण करून नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. ही वेळ जमैकाचा महान धावपटू उसेन बोल्टच्या ९.५८ सेकंदांच्या विक्रमापेक्षा अधिक वेगवान आहे.

बीजिंगच्या 'आइस रिबन' स्टेडियमवर शनिवारी (दि.२२) संध्याकाळी झालेल्या प्राथमिक शर्यतीत तीन ह्युमनॉइड रोबोट्सनी भाग घेतला होता. शर्यत सुरू होण्याचा संकेत मिळताच तिन्ही रोबोट्स वेगाने पुढे सरकले. सीसीटीव्ही न्यूजच्या फुटेजमध्ये तियानझुओ टीम आणि 'विंड-फायर लाइटनिंग' टीमचे रोबोट्स सुरुवातीपासूनच एकमेकांच्या अगदी जवळ धावताना दिसले. शर्यत पुढे सरकत असताना त्यांच्या पावलांचा वेग वाढला आणि हात अधिक जोरात मागे-पुढे हालू लागले. अखेरीस तियानझुओ टीमच्या रोबोटने एका रोबोटच्या लांबीइतके अंतर राखून अंतिम रेषा ओलांडली आणि ९.३९ सेकंदात शर्यत पूर्ण केली. तर, दुसऱ्या क्रमांकावर आलेल्या लाइटनिंग रोबोटने ९.४७ सेकंदात फिनिश लाइन ओलांडली, जी बोल्टच्या विक्रमापेक्षा चांगली आहे.

यशस्वी जैस्वालवर टांगती तलवार

। कोलंबो । वृत्तसंस्था ।

भारत आणि श्रीलंका यांच्यात सुरू असलेल्या कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी मैदानावर चांगलेच वातावरण तापले. भारताचा सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज असिथा फर्नांडो यांच्यात जोरदार वाद झाला. जैस्वाल बाद झाल्यानंतर दोन्ही खेळाडू आमनेसामने आले आणि दोघे एकमेकांशी डोके भिडवतानाही दिसले. मात्र, या घटनेनंतर आता यशस्वीवर आयसीसीच्या कारवाईची टांगती तलवार आहे. त्याच्यावर सामना बंदीची कारवाई होऊ शकते.

गिल सचिन, सेहवागच्या रांगेत

। कोलंबो । वृत्तसंस्था ।

श्रीलंका विरुद्ध भारत संघात कोलंबोमध्ये कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यातील पहिल्याच दिवशी दुसऱ्या सत्रापर्यंत शुभमन गिल आणि देवदत्त पडिक्कल या दोघांनीही अर्धशतके केली. त्यासोबतच गिलने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. या सामन्यात भारतासाठी यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल या सलामीवीरांना चांगली सुरुवात केली होती. परंतु, केएल राहुलला लहिरू कुमाराने १८ धावांवर बाद केले, त्यानंतर यशस्वी जैस्वाल (४५) माघारी परतला. पहिल्या सत्रातच दोन्ही सलामीवीरांना गमावल्यानंतर भारताचा डाव देवदत्त पडिक्कल आणि शुभमन गिल यांनी सांभाळला. या दोघांनी एकमेकांची चांगली साथ देत जवळपास दुसरे पूर्ण सत्र खेळून काढले होते. त्यांनी अर्धशतकही केली. परंतु, टी ब्रेक होण्याआधीच्या शेवटच्या षटकात गिलला असिथा फर्नांडोने निरोशान डिकवेल्लाच्या हातून झेलबाद केले. गिलने १०८ चेंडूत ५० धावांची खेळी केली. पडिक्कल मात्र त्याच्या लयीत खेळत होता. टी ब्रेक झाला तेव्हा भारताने ३ बाद १८७ धावा केल्या होत्या. दरम्यान, गिलने हे अर्धशतक करताना कसोटी कारकिर्दीत ३००० धावांचा टप्पा पार केला आहे. गिलने ७७ डावांत जवळपास ४३ च्या सरासरीने ११ शतके आणि ९ अर्धशतकांसह ३००० धावा पूर्ण केल्या. असे करणारा तो २८ वा भारतीय खेळाडू ठरला आहे. या यादीत गिलच्या पुढे सचिन तेंडुलकर, विरेंद्र सेहवाग आणि दिलीप वेंगसरकर आहेत.तसेच, सर्वात कमी वयात ३००० धावा करणारा चौथ्या क्रमांकाचा भारतीय ठरला आहे. त्यामुळे गिलने कपिल देव यांना या यादीत मागे टाकले आहे.

मुंबई इंडियन्सची मोठी घोषणा

। मुंबई । प्रतिनिधी ।

कर्णधार हार्दिक पांड्याच्या ट्रेडची चर्चा सुरू असतानामुंबईइंडियन्सने शनिवारी (दि.२२) मोठी घोषणा केली. मुंबईचे माजी फलंदाज व क्रिकेट प्रशासक झुबीन भरुचा यांची मुंबई इंडियन्स संघाच्या डायरेक्टर ऑफ परफॉर्मन्सपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भरुचा हे मुंबई इंडियन्सच्या जागतिक नेटवर्कमधील विविध विभागांमधील नेतृत्व आणि सपोर्ट स्टाफसोबत एकत्र काम करतील. खेळाडूंच्या विकासाची आणि कामगिरीतील सातत्याची परंपरा अधिक मजबूत करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट असेल. झुबीन भरुचा यांच्याकडे उच्च-स्तरीय क्रिकेट प्रशासनाचा दोन दशकांचा अनुभव आहे. त्यांनी राजस्थान रॉयल्सचे टीम डायरेक्टर आणि क्रिकेट ऑपरेशन्स प्रमुख (२००८-२०२५) म्हणून काम पाहिले आहे, तसेच दिल्ली डेअरडेव्हिल्सचे टेक्निकल डायरेक्टर (२०१६-२०१७) म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. सलामीवीर म्हणून भरुचा यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबईचे प्रतिनिधित्व केले आहे.



देवदत्त पडिक्कलचे शानदार शतक | पहिल्या डावात ३०० धावांचा डोंगर

भारतीय संघाचे पहिल्या दिवशी वर्चस्व

। कोलंबो । वृत्तसंस्था ।

श्रीलंका विरुद्ध भारत संघात रविवार दि.२३ ऑगस्ट रोजी कसोटी मालिकेतील दुसरा सामना कोलंबोमध्ये सुरू झाला आहे. या सामन्यात भारतीय संघाने पहिल्या दिवशी वर्चस्व ठेवले असून, पहिला दिवस २६ वर्षीय देवदत्त पडिक्कलने गाजवला. त्याने पहिल्या डावात शानदार शतक केले. याशिवाय भारताचा कर्णधार शुभमन गिलनेही या सामन्यात अर्धशतक केले आहे.

या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकल्यानंतर प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भारताकडून यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल सलामीला मैदानात उतरले. त्यांनी सुरुवात चांगली केली; परंतु, केएल राहुल १८ धावांवरच बाद झाला. त्यानंतर यशस्वी जैस्वाल चांगला खेळत होता, त्याला देवदत्त पडिक्कल साथ देत होता. परंतु, १७ व्या षटकात जैस्वाल त्रिफळाचीत झाला. मात्र, त्यानंतर जैस्वाल आणि फर्नांडोमध्ये बाचाबाची झाली. त्यानंतर शुभमन गिल आणि देवदत्त पडिक्कल यांनी दमदार फलंदाजी करत डाव पुढे नेला. त्यांनी संघाला १८० धावांचा टप्पाही पार करून दिला. मात्र, त्यांनी १२० धावांची भागीदारी करताना वैयक्तिक अर्धशतकेही केली होती. परंतु, दुसरे सत्र संपण्याचे शेवटचे षटक सुरू असतानात गिल झेलबाद झाला. गिलने १०८ चेंडूत ६ चौकारांसह ५० धावांची खेळी केली. त्यानंतर रिषभ पंत फलंदाजीला आला. परंतु, तिसऱ्या सत्रादरम्यान त्याच्या मनगटाला जोरात चेंडू लागल्याने तो ३ धावांवर रिटायर्ड हर्ट झाला. दरम्यान, पंत बाहेर गेल्याने रवींद्र जडेजा मैदानात आला. त्याने पडिक्कलची भक्कम साथ देताना ७४ धावांची भागीदारी केली. यादरम्यान पडिक्कलने ७० व्या षटकात १६८ चेंडूत त्याचे दुसरे कसोटी शतक पूर्ण केले. दरम्यान, जडेजा आणि पडिक्कल भारताचा डाव पुढे असताना पडिक्क त्रिफळाचीत झाला. त्याने ११७ धावांची खेळी केली. तो बाद झाल्यानंतर जडेजाने ध्रुव जुरेलला साथीला घेतले. दिवसाच्या अखेरीस जडेजा देखील ४३ धावांवर त्रिफळाचीत झाला. त्यामुळे पदार्पणवीर सारांश जैनला मैदानात उतरावे लागले. त्यानंतर लगेचच ८५ षटके पूर्ण झाल्यानंतर पहिल्या दिवसाचा खेळ थांबवण्यात आला. पहिल्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा भारताने पहिल्या डावात ८५ षटकात ५ बाद ३०० धावा केल्या आहेत. ध्रुव जुरेल ७ धावांवर नाबाद आहे, तर सारांश जैन ४ धावांवर नाबाद आहे. यावेळी श्रीलंकेकडून असिथा फर्नांडोने ३ बळी, तर लहिरू कुमारा आणि केशरा नुवंथा यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

सलग दोन कसोटी शतक

देवदत्त पडिक्कलने श्रीलंकेविरुद्ध गॉलला झालेल्या पहिल्या कसोटी सामन्यातही पहिल्या डावात १६७ धावांची खेळी केली होती. त्यानंतर त्याने आता कोलंबोमध्येही शतक केले आहे. त्यामुळे भारतासाठी परदेशात तिसऱ्या क्रमांकावर सलग दोन कसोटीत शतक करणारा पडिक्कल गेल्या ८ वर्षातील पहिलाच फलंदाज आहे. यापूर्वी शेवटचे असे २०१८-१९ मध्ये झालेल्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये झाले होते. त्यावेळी चेतेश्वर पुजाराने तिसऱ्या क्रमांकावर मेलबर्न कसोटीत १०६ धावांची खेळी केली होती, त्यानंतर सिडनी कसोटीतही त्याने १९३ धावांची खेळी केली होती.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)